

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

डिसेंबर २०२३ | आवृत्ती–०६

## 111 वा दीक्षांत समारंभ विशेषांक




विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

ई मासिक विद्यासंवाद

दीक्षांत समारंभ विशेषांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

डिसेंबर २०२३|आवृत्ती–०६



मार्गदर्शक

**डॉ. सुभाष चौधरी**

कुलगुरु

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**

प्र–कुलगुरु

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक

**डॉ. राजू हिवसे**

कुलसचिव

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक

**श्री. प्रेमदास वाडकर**

जनसंपर्क अधिकारी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक

**श्री. प्रवीण गोतमारे**

प्रकाशन अधिकारी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर




मा. राज्यपाल

**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु

**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र–कुलगुरु

**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव

**डॉ. राजू हिवसे**

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।






## नव्या शैक्षणिक धोरणाने देश वैश्विक ज्ञानशक्ती बनेल
## माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचे प्रतिपादन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ उत्साहात

भारतीय मूल्यांना अनुसरून सर्वांना उच्च व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मूळ उद्देश आहे. यामुळे देश एक वैश्विक ज्ञानशक्ती (ग्लोबल नॉलेज पॉवर) म्हणून स्थापित होईल, असा विश्वास देशाच्या माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी व्यक्त केला. या विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले हे प्रशंसनीय असल्याचे त्या म्हणाल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या प्रमुख उपस्थितीत रेशीम बाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षांत समारंभ शनिवार दिनांक २ डिसेंबर २०२३ रोजी पार पडला. वेळी त्या मुख्य अतिथी म्हणून मार्गदर्शन करीत होत्या.

दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी भूषविले तर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उच्च शिक्षणमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी उपस्थित होते. पुढे बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी औपचारिक पदवी हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नसून वेगाने बदल घडणाऱ्या जगात निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय असावे, असे आवाहन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची शतकी वाटचाल उच्च परिमाणे स्थापित करणारी ठरली आहे. समृद्ध वारसा जोपासणाऱ्या या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्वाचे योगदान दिल्याचा गौरवास्पद उल्लेख करुन राष्ट्रपती म्हणाल्या, विद्यापीठाचे माजी विद्यार्थी अनेक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांचे सहाय्य घेऊन विद्यापीठाला ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलंस बनवावे. देशाच्या विकासात संशोधन व नाविन्यतापूर्ण शिक्षणाची मोलाची भूमिका आहे. हे विद्यापीठ संशोधन, नाविन्यतापूर्ण शिक्षण व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे या विद्यापीठातील फॅकल्टी मेंबर्सच्या नावाने ६० हून अधिक पेटंटची नोंदणी झालेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी इंक्युबॅशन सेंटर निर्माण केले आहे. स्थानिक प्रश्न आणि गरजा लक्षात घेऊन संशोधनावर भर द्यावा, असे आवाहन ही त्यांनी केले. विद्यापीठाच्या पदवी प्राप्त तसेच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय असल्याबद्दल विशेष समाधान व्यक्त करुन मुलींच्या शिक्षणातील गुंतवणूक ही देशासाठी मोलाची असल्याचे त्या म्हणाल्या. उज्ज्वल भविष्याची वाटचाल करत असताना विपरीत परिस्थिती उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी ज्ञान व आत्मशक्तीने लढावे व आपल्या योग्यतेवर सदैव विश्वास ठेवावा असा संदेश देतांनाच राष्ट्रपतींनी संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील

व्हावे मोठे बाबूसाहेब। काम जुजबी पैसा खूब।
मोठी पदवी दिखाऊ ढब। ही उच्चता म्हणोचि नये॥
या अभंगाचा दाखला ही दिला.




## जागतिक संधीचा लाभ घ्यावा - राज्यपाल

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध होत असल्याचा विश्वास राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केला. पुर्वी ब्रिटीशकालिन मानसिकतेच्या प्रभावातून नोकरीसाठी शिक्षण होते. आता प्रधानमंत्री मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडत आहेत. विद्यार्थ्यांनी नोकरीसाठी न शिकता जागतिक स्तरावरील विकसित कौशल्य आत्मसात करावे, सोबत एखादी जागतिक भाषा आत्मसात करावी. कुशल मानव संसाधन निर्माण करण्यासोबतच योग शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन या क्षेत्रातील जागतिक संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

## विकासात विद्यापीठाचे मोलाचे योगदान
### - केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी




विदर्भाच्या विकासात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मोलाचे योगदान आहे. विदर्भ हा महाराष्ट्राचा विकसनशील भाग असून विद्यापीठाच्या माध्यमातून स्थानिक गरजांनुसार संशोधन होण्याची गरज आहे. विद्यापीठाने गुणवत्ता राखत शिक्षणाचे सार्वत्रिकरण करावे. विदर्भातील थोर संत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज व देशाचे प्रथम कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा आदर्श ठेवत विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण व संस्कार मिळेल अशी पद्धत विकसित करावी, असे आवाहन केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी केले. भविष्यात शिक्षणालाच महत्व आहे. प्रधानमंत्र्यांनी शिक्षणाचे संपत्तीत रूपांतर करण्याचे आवाहन केले आहे. शिक्षणामुळेच जागतिक आर्थिक महासत्तेचे देशाचे स्वप्न साकार होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




## गुणात्मक मनुष्यबळाची गरज
### - श्री. देवेंद्र फडणवीस

गुणात्मक मनुष्यबळ तयार करणे ही काळाची गरज आहे. जागतिक स्तरावर बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करू शकेल अशी युवापिढी घडविण्याचे आव्हान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने स्वीकारावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केले. विद्यापीठ नवसंशोधनाचे केंद्र म्हणून विकसित होत असून स्टार्टअप इको सिस्टीममध्ये महाराष्ट्राने देशात पहिला क्रमांक पटकाविला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातही नव संशोधन आणि स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उत्तम कार्य सुरु आहे. शकत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात नवसंशोधन तसेच सर्वांगिन विकासासाठी १०० कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. नवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यापीठ सज्ज असल्याचा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.







विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेतून डि.एससी. पदवी प्राप्त करणारे डॉ. रामचंद्र हरीसा तुपकरी आणि डॉ. टि. व्ही. गेडाम सुवर्णपदक आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थिनी राजश्री ज्योतीदास रामटेके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पदक देवून गौरविण्यात आले. विद्या शाखानिहाय १२९ संशोधकांना या कार्यक्रमात आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक करताना कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठाच्या गौरवशाली इतिहासाची माहिती दिली. शताब्दी वर्षांमध्ये विद्यापीठाकडून राबविल्या जात असलेले विविध उपक्रम, शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त चारही जिल्ह्यात सामाजिक आर्थिक विकासाचे प्रयत्न आरंभ केल्याचे त्यांनी सांगितले.

## दीक्षांत मिरवणुकीने राष्ट्रपतींचे आगमन

दीक्षांत मिरवणुकीद्वारे माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांचे कार्यक्रम स्थळी आगमन झाले. दीक्षांत मिरवणुकीमध्ये माननीय राज्यपाल श्री रमेश बैस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उच्च शिक्षणमंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल साबळे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनोजकुमार डायगव्हाणे, डॉ. नंदकिशोर करडे, श्री. वामन तुर्के, डॉ. संतोष चव्हाण, श्री. अजय चव्हाण, डॉ. अजय अग्रवाल, डॉ. समय बनसोड, डॉ. पांडुरंग डांगे, डॉ. योगेश भुते, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ. निळकंठ लंजे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. प्रशांत कडू व डॉ. शामराव कोरेटी यांचा समावेश होता. दीक्षांत मिरवणूक यशस्वीपणे पार पाडण्याची जबाबदारी विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले, प्रभारी सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. वर्षा देशपांडे व डॉ. अमृता इंदूरकर यांनी पार पाडली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वाणिज्य -व्यवस्थापनातून आता कौशल्याचे धडे
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा आयसीएआय सोबत सामंजस्य करार





वाणिज्य व व्यवस्थापन विषयातून देखील कौशल्याचे धडे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विविध आस्थापना, उद्योगांना असलेली कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांना कौशल्यपूरक अभ्यासक्रमाचे शिक्षण मिळावे म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) सोबत सामंजस्य करार केला आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व आयसीएआयच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष श्री. विशाल दोशी यांनी सामंजस्य कराराचे शनिवार दिनांक २ डिसेंबर २०२३ रोजी हस्तांतरण केले.

विद्यापीठाच्या सभा कक्षात झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी आयसीएआय बरोबर होत असलेल्या सामंजस्य कराराचे स्वागत केले. भविष्यकालीन गरजा लक्षात घेता विद्यार्थ्यांना कौशल्य अभ्यासक्रम मिळणे गरजेचे असून विविध क्षेत्रातील तज्ञांच्या मदतीने विद्यार्थ्यांना विविध कौशल्य प्राप्त करून देण्याचा विद्यापीठ प्रयत्न करीत असल्याचे कुलगुरू म्हणाले. यावेळी आयसीएआयच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष श्री. विशाल दोशी यांनी विद्यापीठासोबत सामंजस्य करार होत असल्याने आनंद व्यक्त केला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवित असताना विविध क्षेत्रातील तज्ञांसोबत चर्चा करण्याची संधी मिळाली. यातून भारत देश जगातील मोठी आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येत असल्याचे पाहताना कुशल मनुष्यबळ मिळणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. वाणिज्य व्यवस्थापन विद्या शाखेतील विद्यार्थ्यांना कौशल्याचे चांगले शिक्षण मिळावे म्हणून अनेक अभ्यासक्रम तयार केले. डिजिटल लॅबमध्ये प्रात्यक्षिक मिळावे. शिक्षकांनी उत्कृष्ट कौशल्याचे धडे द्यावे, अशा दृष्टीने अभ्यासक्रम तयार केल्याचे दोशी यांनी सांगितले. बैठकीचे प्रास्ताविक करताना वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी सामंजस्य करार करण्यामागील पार्श्वभूमी यावेळी विशद केली. या कराराच्या माध्यमातून विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थी तसेच शिक्षकांना अद्यावत ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करण्याच्या मुबलक संधी उपलब्ध होणार आहेत असेही सांगितले. यावेळी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतर विद्यासाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, आयसीएआयच्या अभ्यास मंडळाचे (विद्वत) अध्यक्ष विशाल दोशी, संजय अग्रवाल, डॉ. एन. एन. सेनगुप्ता, अक्षय गुल्हाने, दिनेश राठी, स्वरूपा यांच्यासह अन्य उपस्थित होते.




## विद्यापीठाचा महिला-पुरुष योगासन संघ ऑल इंडिया स्पर्धेसाठी पात्र

अण्णा विद्यापीठ, चेन्नई यांच्या अधिपत्याखाली घेण्यात आलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाने समाधानकारक कामगिरी केली आहे. याच कामगिरीच्या आधारे विद्यापीठाचा पुरुष व महिला संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

प्रशिक्षक डॉ. तेजसिंह जगदाळे यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पुरुष संघाने पश्चिम विभागीय योगासन स्पर्धेत सहावे स्थान प्राप्त केले. तर महिला संघाने सातवे स्थान प्राप्त केले. याच कामगिरीच्या जोरावर दोन्ही संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी पात्र ठरले आहे. यंदा विद्यापीठ योगासन संघाने अ. भा. आंतर विद्यापीठ स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. दोन्ही संघाच्या या कामगिरीबद्दल क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. तर कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी विद्यापीठ संघाचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यापीठाच्या पुरुष संघात- वैभव श्रीरामे, प्रणय कंगाले, वंश खिंची- तिन्ही एस.बी. सिटी महाविद्यालय, हर्षल चुटे- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, ओम राखडे- धनवटे नॅशनल कॉलेज. राखीव- आकाश बुरडे, अनिकेत खारपुरीया, क्षितीज भांडवलकर- तिन्ही नबिरा महाविद्यालय, काटोल, आशिष मुरकुटे- एडी कॉलेज. तर महिला संघात कल्याणी चुटे, सुहानी गिरीपुंजे- दोन्ही एसबी सिटी कॉलेज, छकुली सेलोकार- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, रचना अंबुलकर- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, अलिशा गायमुखे- कमला नेहरु महाविद्यालय, श्रेया धामडे- नबीरा महाविद्यालय. राखीव- श्रावणी गोलाईत- कमला नेहरु महाविद्यालय, आदिती चौधरी- आयडीसीपी नागपूर, ऋतुजा डोंगरे- नबीरा महाविद्यालय, यामिनी गवई- नागार्जुना इंस्टिट्यूट यांचा समावेश आहे.




## सत्ता हस्तांतरणात अडथळा न येणे राज्यघटनेचे सौंदर्य - राहुल पांडे

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा, विभागात संविधान दिन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधानाच्या माध्यमातून संसदीय व्यवस्था दिली आहे. त्याचे महत्त्व आज कळत आहे. जगातील सर्वात शक्तिशाली देश असलेल्या अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प निवडणूक हरले तेव्हा त्यांच्या समर्थकांनी हिंसाचाराचा अवलंब केला. व्हाईट हाऊस ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. पण भारतातील ७५ वर्षांच्या राजवटीत असे कधीच घडले नाही. आणीबाणीनंतर तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांचा निवडणुकीत पराभव झाला तेव्हा त्यांनी शांतपणे सत्ता हस्तांतरित केली. पक्ष आणि उमेदवाराबाबत मतभेद असू शकतात, पण जेव्हा कोणी निवडणूक हरले, तेव्हा त्याने शांततेने सत्ता हस्तांतरित केली. हे भारतीय राज्यघटनेचे खरे सौंदर्य आहे, असे प्रतिपादन राज्याचे माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा, विभागातर्फे गुरुवारी 'भारतीय संविधान आणि आपण' या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी होते. मंचावर आयोजक विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले उपस्थित होते.

राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ राहुल पांडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनात्मक आणि शांततापूर्ण मार्गाने एकाच फटक्यात वर्षानुवर्षे चालत आलेली अस्पृश्यता संपवण्याचा प्रयत्न केला. संविधानाद्वारे त्यावर बंदी घातली. ही एका क्रांतीपेक्षा कमी नव्हती. जोपर्यंत देशात बंधुभाव, सामाजिक समता आणि व्यक्तीचा आदर केला जात नाही, तोपर्यंत देशातील एकता नगण्यच राहील. निर्माण झालेल्या व्यवस्थेच्या रक्षणासाठी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत प्रयत्न करावे लागतील असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी म्हणाले की, देशात विषमतेचे वेगळे रूप समोर आले आहे. ग्रामीण आणि शहरी भागात विषमता वाढली आहे. रोजगारासाठी शहरात जावे, असे गावकऱ्यांना वाटते. ग्रामीण तरुण शहरांकडे गेले तर देश शेतीप्रधान कसा राहणार? गावांचा विकास होईल तेव्हाच देशाचा विकास होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास व विचारधारा विभागाचे प्रमुख डॉ.अविनाश फुलझेले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचलन शारदा चव्हाण यांनी केले तर आभार प्रदीप बनसोडे यांनी मानले. यावेळी माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागातील डॉ. मोहन वानखडे, डॉ. गौतम कांबळे, डॉ. रमेश शंभरकर, डॉ.सरोज डांगे, डॉ. मंगेश जुनघरे तसेच विद्यार्थी उपस्थीत होते.



## जी एच रायसोनी, सेंट विन्सेट पलोटी विद्यालयाची आगेकूच

### आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे आयोजित आंतर महाविद्यालयीन महिला गटातील हँडबॉल स्पर्धेत जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि सेंट विन्सेट पलोटी इंजीनियरिंग कॉलेज संघाने दमदार खेळी करीत विजयी सुरुवात केली आहे.

रवी नगरातील विद्यापीठाच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्‌घाटन सोमवार, दिनांक ४ डिसेंबर रोजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य डॉ. दामोदर सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. नितीन जंगीटवार , स्पर्धाप्रमुख डॉ. धीरज भोसकर, डॉ. निशांत तिपटे, राकेश बनसोडे, सागर गुप्ता आदी उपस्थित होते. स्पर्धेत जी. एच रायसोनी कॉलेजने ताई गोळवलकर रामटेक कॉलेजला ७-३ ने आणि नंतरच्या लढतीत गोंदियाच्या डी. बी. सायंस महाविद्यालयाला ४-० ने मात देत विजयी आगेकूच कायम ठेवली आहे. विजयी संघाच्या अनिका पयासी आणि क्रिपी शर्माने प्रत्येकी दोन गोलचे योगदान दिले. त्यानंतरच्या लढतीत सेंट विन्सेट पलोटी विद्यालयाने सावनेरच्या हरिभाऊ आदमने कॉलेजचा ४-० ने धुव्वा उडविला. विजयी संघाच्या इंद्रा सिंगने दोन तर सृष्टी रावले व आस्था वंजारीने प्रत्येकी एक गोलचे योगदान दिले.







## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कर्तव्यपूर्ती सोहळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात कर्तव्यपूर्ती सोहळा सोमवार, दिनांक ४ डिसेंबर २०२३ रोजी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील निवड श्रेणी लिपिक श्री कमलाकर पांडुरंगजी खोंडेकर, शिष्यवृत्ती कक्षातील निवड श्रेणी लिपिक श्री संजय गुलाबराव मेश्राम, मुद्रण व प्रकाशन विभागातील निवड श्रेणी लिपिक श्री सुनील महादेवराव कातुरे, ज्ञान स्त्रोत केंद्रातील निम्न श्रेणी लिपिक श्री सुनील मनोहरराव खोटपाल, पदव्युत्तर शिक्षण विभागातील श्रीमती लता मधुकर मोहोड यांचा सेवानिवृत्ती निमित्त डॉ. संजय दुधे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी चांगल्या सहवासात राहिल्याने व्यक्तींचा स्वभाव चांगला राहतो. जीवनात चढ उतार येत राहतात, नेहमी चांगले होईल याचे प्रयत्न करावे. निर्णय बदलत असतात. महाभारत व रामायणातील उदाहरण देत सर्वांशी मिळून मिसळून कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.



## समता, न्याय, बंधुता या मूल्यांवर लोकशाही टिकून

### ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा यांचे प्रतिपादन
### पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात संविधान दिवस

समता, न्याय, बंधुता या मूल्यांवर लोकशाही टिकून असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील जेष्ठविधीतज्ज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात ७४ वा संविधान दिवस कार्यक्रम मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर २०२३ रोजी पार पडला. यावेळी फिरदोस मिर्झा प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील जेष्ठविधीतज्ज्ञ ॲड. फिरदोस मिर्झा, विद्यापीठ आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, अधिसभा सदस्य तथा पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे, डॉ. प्रविणा खोब्रागडे यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर होते. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे महत्त्व समजावून सांगताना ॲड. फिरदोस मिर्झा यांनी त्यातील पाच शब्द महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. बंधुत्व नसले तर समता कशी राहील, समता नसेल तर न्याय कसा मिळेल, हे पटवून देताना त्यांनी सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्षता यातील फरक सांगितला. संविधान अधिक चांगल्या प्रकारे समजायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील शेवटचे भाषण वाचा असे आवाहन देखील त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी संविधानातील मूलभूत कर्तव्य जाणून घेत त्याच्या रक्षणाची जबाबदारी घ्यावी लागेल असे सांगितले. अध्यक्षीय भाषण करताना विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश असल्याचे सांगितले. संचालन प्रा. प्रज्ञा नंदमाटे यांनी केले तर आभार प्रा. प्राची वासनिक यांनी मानले.

# कार्तिक मिरे, भाग्यश्री डाहकेला सुवर्ण आंतरमहाविद्यालय धनुर्विद्या स्पर्धा



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा क्रीडा विभाग आणि प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालय धनुर्विद्या स्पर्धेत पुरुष गटात कार्तिक मिरेने सुवर्ण तर महिला गटात भाग्यश्री डाहकेने सुवर्णपदक प्राप्त केले. स्पर्धेत पुरुष गटात धरमपेठ सायंस कॉलेजच्या कार्तिकने सर्वाधिक ४६६ गुण मिळवित अव्वलस्थान प्राप्त केले.

जीएस कॉलेज नागपूरच्या विनय बिंदने ४५२ गुणांसह दुसरे आणि पीडब्ल्यूएस कॉलेजच्या कनिष्क रोडगेने ३४५ गुणांसह तिसरे स्थान प्राप्त केले. महिला गटात आर्ट कॉमर्स व सायंस आर्वीच्या भाग्यश्री डाहकेने २८६ गुणांसह प्रथम स्थान तर तिचीच सहकारी शिवानी जुनघरेने १२९ गुणांसह दुसरे आणि शिवाजी सायंसच्या वैष्णवी धाबरेने ८४ गुणांसह तिसरे स्थान प्राप्त केले. तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी साईबाबा लोकसेवा संस्थेचे सचिव किशोर उमाटे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. विद्यापीठाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. डॉ. डी. आर. सातपुते, स्पर्धेचे तांत्रिक व्यवस्थापक नागपूर जिल्हा आर्चरी असोसिएशनचे सचिव संजय कहुरके, निवड प्रमुख डॉ. चंद्रमोहन बिस्ट व रोमी बिस्ट आदी उपस्थित होते. स्पर्धेमध्ये एकूण ३२ महाविद्यालयाने सहभाग नोंदविला. इंडियन, कंपाउंड आणि रिकव्हर या प्रकारात खेळाची स्पर्धा पार पडली. संचालन डॉ. वैशाली चिल्लूरे यांनी व आभार प्रा. काजल लंबाटे यांनी मानले.




## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात सामाजिक क्रांती घडवून आणली - प्रा. अशोक गोडघाटे

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महापरिनिर्वाण दिन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात अभूतपूर्व सामाजिक क्रांती घडवून आणली, असे प्रतिपादन प्रा. अशोक गोडघाटे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात बुधवार, दिनांक ६ डिसेंबर २०२३ रोजी महापरिनिर्वाण दिन पार पडला. महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रा. गोडघाटे मार्गदर्शन करीत होते.

व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते तर व्याख्याते म्हणून प्रा. अशोक गोडघाटे प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल, प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री वामनराव तुर्के यांची उपस्थिती होती. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक योगदान' या विषयावर पुढे मार्गदर्शन करताना प्रा. गोडघाटे यांनी स्वातंत्र्यलढा सुरू असताना जगामध्ये फ्रान्स, रशिया येथे क्रांती झाली, या आणि भारतातील क्रांतीमध्ये फरक असल्याचे सांगितले. माणसाने स्वतःच्या गुलामगिरीलाच मान्यता दिली होती. या समाजाला यातून बाहेर काढणे सोपे नव्हते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली क्रांती वेगळी होती, असे गोडघाटे म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ घटनेचे शिल्पकार नव्हे तर संपूर्ण देशाचे शिल्पकार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करताना विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्याच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आधार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.





## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करीत आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रा. अशोक गोडघाटे, माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, , विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, व्यवस्थापन परिषद सदस्य वामनराव तुर्के, प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांच्यासह विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख अधिकारी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.




## आर्यन, ओजस्वी, शलय, आर्याला सुवर्णपदक - आंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या स्पर्धा

प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालय आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या स्पर्धेत विविध प्रकारात शलय खडगी, आर्या राउत, आर्यन ढगे, ओजस्वी साळवे यांनी सुवर्णपदक आपल्या नावे केले. ओंकार नगरातील प्राचार्य कलोडे महाविद्यालयाच्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली.

स्पर्धेत तिसऱ्या दिवशी झालेल्या पुरुषांच्या रिकव्हर प्रकारात देवळीच्या एसएसएनजे कॉलेजच्या आर्यन ढगेने ६५९ गुणांसह सुवर्णपदक तर आर डब्ल्यू कॉलेज ऑफ आर्ट्सच्या प्रेमांश डांहेने ६१० गुणांसह रौप्य आणि एमडीएसएस महाविद्यालयाच्या दिव्यांश सुरीने ६०५ गुणांसह कांस्यपदक प्राप्त केले. महिला गटात लोक महाविद्यालय वर्धेच्या ओजस्वी साळवेने ५३३ गुणांसह सुवर्ण तर प्रियदर्शनी कॉलेजच्या समृद्धी रंगारीने रौप्यपदक प्राप्त केले. स्पर्धेत कंपाउंड पुरुष गटात व्हीएमव्ही कॉलेजच्या शलय खडगीने ६७७ गुणांसह सुवर्ण तर त्याचा सहकारी हर्ष मतेने ६६५ गुणांसह रौप्यपदक आणि कांस्यपदक डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या आर्यन नागरने ६३२ गुणांसह प्राप्त केले. महिला गटात शिवाजी सायंसच्या आर्या राउतने २१६ गुणांसह सुवर्णपदक तर एसव्हीपीसीईटी कॉलेजच्या इंद्रा बेचपालने १६ गुणांसह रौप्यपदक प्राप्त केले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान साईबाबा लोकसेवा संस्था अध्यक्ष ॲड. ओंकार उमाठे यांनी भुषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार किशोर बागडे, विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संजय चौधरी, नागपूर जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे सचिव संजय कहुरके, स्पर्धेचे संयोजन प्राचार्य डॉ. नितीन जंगीटवार, स्पर्धेचे पंच प्रा. संदीप काळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कलोडे महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. संचालन डॉ. सचिन भोगेकर व आभार प्रा. विश्वजीत घिनमिने यांनी मानले.




## चळवळीतून तत्वज्ञानाची निर्मिती

### - श्री ताराचंद्र खांडेकर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात महापरिनिर्वाण दिन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधी चळवळ उभी केली. नंतर त्या चळवळीतून तत्त्वज्ञान उभे केले. त्यामुळे चळवळीतून तत्त्वज्ञानाची निर्मिती होते, असे प्रतिपादन श्री. ताराचंद खांडेकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात बुधवार, दिनांक ६ डिसेंबर २०२३ रोजी महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम पार पडला. यावेळी "आंबेडकरवादा पुढील आव्हाने " या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले होते.

ज्येष्ठ आंबेडकरी अभ्यासक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य ताराचंद्र खांडेकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सगळ्या विचारांचा, त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचा आणि त्यांनी केलेल्या क्रांतीचा समग्र विचार करून आज आंबेडकरवादा पुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. त्या आव्हानांची सोडवणूक करताना अतिशय गंभीरपणे याचा विचार केला पाहिजे. केवळ ज्ञानी होणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित नव्हते तर प्रज्ञावंत होणे अपेक्षित होते. अध्यक्षीय भाषण करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागाचे प्रमुख डॉ.अविनाश फुलझेले म्हणाले की, आंबेडकरी चळवळी समोर अनेक आव्हाने आहेत. सामजिक, सांस्कृतिक व राजकीय आव्हानाला पेलताना आपण माणसे जुळवली पाहिजेत. संचलन दिपाली जाधव यांनी केले तर आभार लक्ष्मी पाझरे यांनी मानले. यावेळी आंबेडकर विचारधारा विभागातील डॉ. धनराज दहाट , डॉ.गौतम कांबळे, डॉ.रमेश शंभरकर, डॉ.मोहन वानखडे, डॉ.सरोज डांगे, मंगेश जुनघरे, प्रीती वानखेडे तसेच प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थीत होते.



## भंडाऱ्याच्या जे. एम. पटेल कॉलेजला विजेतेपद

### आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेत महिलांच्या गटात भंडाऱ्याच्या जे. एम. पटेल कॉलेजने कामठीच्या एमडब्ल्यूएसएसएमव्हीला नमवित स्पर्धेतील जेतेपद प्राप्त केले.

रवी नगरातील विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर स्पर्धेतील अंतिम लढत पटेल कॉलेज विरुद्ध एमडब्ल्यूएसएसएमव्ही या संघात झाली. यात १३-७ ने जे. एम पटेल कॉलेजने बाजी मारली. विजयी संघाकडून कल्याणी कानवडेने सर्वाधिक ७ तर प्रियांशी अंबाडेने चार तर काजल बडोले व आर्या तुमसरेने प्रत्येकी एका गोलचे योगदान दिले. पराभूत संघाकडून गुंजन गुप्ताने चार तर तनया महतोने दोन व प्रिती सतबीरने एक गोल नोंदविला. तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत आयडीसीपीईला काटोलच्या नबीरा महाविद्यालयाने अवघ्या एका गोलफरकाने म्हणजेच ९-८ गोल संख्येने नमवित बाजी मारली. विजयी संघाकडून धनश्री नासरने सर्वाधिक ४ गोल तर सुदीप्ता कुमारने २ आणि वैशाली ओरलिया, श्रुती भिमटे, चांदनी कळंबेने प्रत्येकी एका गोलचे योगदान दिले. आयडीसीपीईकडून सर्वाधिक ५ गोलचे योगदान ऋतुजा कारमने दिले. अंतिम सामन्यास प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, जीएचआरसीईचे संचालक डॉ. सचिन उंटवाले, प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन जंगीटवार, तायवाडे महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख डॉ. सुनील भोतमांगे, जे. एम. पटेल कॉलेजचे डॉ. रोमी बिस्ट, डॉ. भीमराव पवार, नबीराचे डॉ. अमित कुमार खांडेकर, सी पी अँड बेरारचे डॉ. निशांत तिपटे, डॉ. चंदन सिंग, स्पर्धा प्रमुख डॉ. धीरज भोसकर आदी उपस्थित होते.




# समानतेतून होईल समृद्ध समाजाची निर्मिती




## कौटुंबिक न्यायालयाच्या अधिवक्ता डॉ. रेखा बारहाते यांचे प्रतिपादन
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात लिंग संवेदना जनजागृती कार्यक्रम

समानतेतून समृद्ध समाजाची निर्मिती होईल, असे प्रतिपादन नागपूर कौटुंबिक न्यायालयाच्या अधिवक्ता डॉ. रेखा बारहाते यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव वर्ष अंतर्गत कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी लिंग संवेदना जनजागृती कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाराहाते मार्गदर्शन करीत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, प्रमुख वक्त्या म्हणून कौटुंबिक न्यायालय नागपूर येथील अधिवक्ता डॉ. रेखा बारहाते, समाजसेविका सौ. माधुरी साकुळकर, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्षा डॉ. शालिनी लिहितकर यांची उपस्थिती होती. पुढे मार्गदर्शन करताना डॉ. बारहाते यांनी लिंग संवेदना या विषयावर चर्चा तसेच जनजागृती होण्याची गरज व्यक्त केली. पितृसत्ताक परंपरेमुळे लिंगभेदाचे विचार डोक्यातून जात नाही. डोक्यातून विचार जाण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागतील. घरातील चित्र बदलले तर सामाजिक चित्र बदलेल, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना सौ. माधुरी साकुळकर यांनी कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण कायद्याची माहिती त्यांच्या भाषणात दिली. यावेळी मनोगत व्यक्त करताना अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी समाजमन तयार करण्यासाठी समानतेचा प्रवास सुरू ठेवावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी आपल्या देशात लिंग, वंश, जाती, धर्म यावरून भेद केला जाणार नाही हे अधिकार संविधानाने दिल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्षा डॉ. शालिनी लिहितकर यांनी केले. संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी मानले.







## आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत रिया दोहतरे- शादाब पठाण अव्वल

## जीवन देखील क्रॉसकंट्रीच - डॉ. संजय दुधे

### आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत पुरुष गटात शादाब पठाण तर महिला गटात रिया दोहतरे अव्वल ठरले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची आंतर महाविद्यालयीन पुरुष/महिला गटाची क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धा जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, विद्यापीठ परिसर, अमरावती रोड येथे रविवार, दिनांक ३ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी जीवन देखील क्रॉस कंट्री सारखेच असल्याचे सांगितले.






विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेची सुरुवात प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी झेंडा दाखवून केली. पुरुष गटामध्ये अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय सिरोहा येथील खेळाडू शादाब पठाण याने प्रथम क्रमांक, एसबी सीटी महाविद्यालय नागपूर येथील खेळाडू सौरभ तिवारी याने द्वितीय तर पीडब्ल्यूएस महाविद्यालयाचा राजन यादव याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. महिला गटात चक्रपाणी महाविद्यालय नागपूरची रिया दोहतरे हिने प्रथम क्रमांक, मोहता विज्ञान महाविद्यालयाची खेळाडू मिताली भोयर हिने द्वितीय तर पीजीटीडी शारीरिक शिक्षण विभागातील तेजस्विनी लांबकाने हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. पुरुष गटात अरविंद बाबू देशमुख महाविद्यालय भारसिंगीने चॅम्पियनशिप प्राप्त केली तर एसबी सीटी महाविद्यालय नागपूर द्वितीय स्थानावर राहिले. महिला गटात चॅम्पियनशिप करिता कोणीही पात्र ठरले नाही.

पुरस्कार वितरण समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, अधिसभा सदस्य डॉ. संजय चौधरी, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे सदस्य डॉ. नितीन जांगीटवार, प्राचार्य डॉ. सचिन चाफले, नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष श्री. गुरुदेव नगराळे यांची उपस्थिती होती. आंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेत विविध महाविद्यालयातील एकूण ५०० वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पुरुष गटात ५१ महाविद्यालय, महिला गटात ३१ महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

प्रास्ताविक करताना शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी उत्साह पूर्ण वातावरणात ही स्पर्धा होत असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय दर्जाची सिंथेटिक ट्रॅक खेळाडूंना सरावासाठी दोन दिवस उपलब्ध करून दिली जाणार आहे सोबतच स्पोर्ट सायन्स सेंटर सुरू केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. वैद्यकीय मदत विद्यापीठ आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज श्यामकुवर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. निवड समितीचे कामकाज डॉ. जयकुमार क्षीरसागर, डॉ. ललिता पुनिया, डॉ. घनश्याम मकासरे, प्राचार्य डॉ. बबन मोहितकर यांनी सांभाळले. स्पर्धा प्रमुख म्हणून डॉ. विवेकानंद सिंग तर तांत्रिक प्रमुख म्हणून वरिष्ठ सहसचिव राम वाणी यांनी जबाबदारी पार पडली. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य डॉ. सोनाली शिरभाते यांनी केले तर आभार डॉ. जयकुमार क्षीरसागर यांनी मानले. अंतर महाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अनिल भोरे, गणेश वाणी, नितीन धाबेकर, अर्चना कोट्टेवार यांनी सहकार्य केले.




## लिंगभेद जनजागृतीवर पथनाट्य प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्त्व विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती व पुरातत्व विभागामध्ये लिंगभेद जनजागृतीवर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. विभागातील विद्यार्थ्यांकडून शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी हे पथनाट्य सादर करण्यात आले.

विभाग प्रमुख डॉ. प्रभात साहू यांच्या शुभ हस्ते पथनाट्यास सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांची उपस्थिती होती. विभागातील विद्यार्थ्यांनी 'लिंग संवेदना' विषयावर तयार केलेल्या पथनाट्यातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. विभागातील डॉ. एकता धारकर, बुलबुल अग्रवाल, पारस मेश्राम, निश्कूल साहू, सुरभी शेंडे, दिव्या मडावी, अभिषेक पाटील, प्रमोद समर, प्रणव गुप्ता, आशिष गायकवाड यांनी सहभाग घेतला. यावेळी विभागातील प्रा. चेतना वाढवे, प्रा. विपिन बनसोड, डॉ. मोहन पारधी, डॉ. शैला भक्ते, चंद्रा यांनी सहकार्य केले.



## सीपी अँड बेरार, पलोटी, जेसीपीई महाविद्यालयांची विजयी सुरुवात
## आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन हँडबॉल पुरुषांच्या स्पर्धेत जीएच रायसोनी, कलोडे कॉलेज, सीपी अँड बेरार, जेसीपीई महाविद्यालयाने प्रतिस्पर्धीला नमवित स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे.

रवी नगरातील विद्यापीठाच्या मैदानावर शुक्रवारपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत जीएच रायसोनी महाविद्यालयाने आधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाला ९-६ गोलने नमवित विजयी सुरुवात केली. यानंतर कलोडे महाविद्यालयाने आयडीसीपीला १६-९ ने, सीपी अँड बेरार महाविद्यालयाने वर्धेच्या यशवंत महाविद्यालयाचा १७-१ ने धुव्वा उडवित विजयी सुरुवात केली. तर जेसीपीई महाविद्यालयाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा १७-७ आणि तायवाडे महाविद्यालयाने अटीतटीच्या लढतीत धनवटे नॅशनल कॉलेजचा २०-१८ ने नमवित विजयी सुरुवात केली आहे. याशिवाय पलोटी महाविद्यालयाने जीएच रायसोनी कॉलेजचा १४-१२ गोलने पराभव करीत विजयी आगेकूच कायम ठेवली आहे. तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त तसेच आंतरराष्ट्रीय हँडबॉल खेळाडू प्रीती सुपारी, आंतरराष्ट्रीय हँडबॉल खेळाडू व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. आश्लेषा इंगोले, प्राचार्य कलोडे महाविद्यालयाचे डॉ. नितीन जंगीटवार आदी उपस्थित होते.






## भाषा सामाजिक एकात्मतेचा केंद्रबिंदू – डॉ. संजय दुधे - हिंदी विभागात भारतीय भाषा दिवस उत्साहात

भाषा केवळ अभिव्यक्तीचे माध्यमच नव्हे तर आपली ओळख देखील आहे. भाषा ज्ञानाचे संवाहक आहे. सभ्यतेच्या विकासाची प्रवक्ता असून सामाजिक एकात्मतेचा भाषा केंद्रबिंदू असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा हिंदी विभाग आणि राष्ट्रीय सिंधी भाषा विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय भाषा : राष्ट्रीय अपेक्षा' या विषयावर शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

प्रमुख अतिथी आर्य शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री घनश्यामदास कुकरेजा यांनी गरजू नागरिकांची सेवा करणे हे मानवाचे कर्तव्य असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भारतीय भाषांकडून जी राष्ट्रीय अपेक्षा आहे, यावर व्यापक विचार विमर्श होण्याची गरज व्यक्त केली. कार्यशाळेचे बीजभाषण करताना राष्ट्रीय सिंधी भाषा विकास परिषदेच्या सदस्या डॉ. वंदना खुशालानी यांनी भारतीय भाषांमध्ये आपसी सुसंवाद वाढावा म्हणून या कार्यशाळेचे आयोजन असल्याचे सांगितले. विषय तज्ञ भारतीय विचार मंच नागपूरचे संयोजक श्री सुनील किटकरू यांनी त्यांच्या भाषणात एका विद्वान देशात भारताची ओळख होत असल्याचे सांगितले. दक्षिण भारतीय शिक्षण संस्था नागपूरचे संयोजक, सरस्वती विद्यालयाचे माजी प्राचार्य श्री एस. प्रभुरामन यांनी भाषा मनुष्याच्या जीवनातील मोठी शक्ती असल्याचे सांगितले. समारोपीय सत्रात विशेष अतिथीसिंधी नवयुवक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय केवलरमानी यांनी भारतीय भाषांच्या संरक्षणाची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी नूतन महाविद्यालय, उमरेडचे डॉ. विनय कुमार उपाध्याय, डॉ. भारत खुशालानी यांनी विचार व्यक्त केले. कार्यशाळेची अध्यक्षता करताना मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारतीय भाषांच्या माध्यमातून ज्ञान- विज्ञान परंपरेला सुदृढ करण्याचा उपक्रम असल्याचे सांगितले. संचालन सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे व डॉ. सुमित सिंह यांनी केले तर आभार डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी मानले. यावेळी डॉ. एकादशी जैतवार, डॉ. कुंजन लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, प्रा. दिशान्त पाटिल, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. रूपाली हिवसे, डॉ.नीलम वीरानी, श्री किशोर लालवानी यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाची घोषणा
## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा

महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ, छत्तरपुर, मध्य प्रदेश यांच्या अधिपत्याखाली ८ ते ११ डिसेंबर दरम्यान आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतून या संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाची निवड प्रगती महिला महाविद्यालय भंडाऱ्याचे संचालक डॉ. शालिक राठोड, बॅरि. वानखेडेचे डॉ. राजेंद्र राउत, हरीभाऊ आदमने कॉलेजचे डॉ. दिनेश किमता, नुतन आदर्श महाविद्यालयाचे डॉ. बेबी तांबे, निमंत्रित सदस्य नीलेश मते यांचा समावेश असणाऱ्या समितीने केल्याची माहिती नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

विद्यापीठ संघ पुढीलप्रमाणे- निकीता खोब्रागडे, प्रवीणा पारसे, सैनम कोरी (तिन्ही हरीभाउ आदमने कॉलेज, सावनेर), सुरभी पाठक, अरिबा शेख (दोन्ही एलएडी कॉलेज), मिताली पाटील (पीजीटीडी नागपूर), मैथिली जाधव (इन्स्टि. ऑफ सायंस), लक्ष्मी घुग्गुसकर, तनुश्री कुहिकर (जीएच रायसोनी कॉलेज), कांचन रघटाटे (जीएस कॉलेज, वर्धा), रितीशा दुबे (नबीरा महाविद्यालय, काटोल), महिमा दुबे (कमिन्स कॉलेज). राखीव खेळाडू- मिताली डुले (संताजी महाविद्यालय), वनिता खोब्रागडे (साईबाबा आर्ट्स -सायंस कॉलेज), तन्वी गोतमारे (केझेडएस विज्ञान कॉलेज), साना खान (अंजुमन गर्ल्स कॉलेज), एकता सारकर (एमएके महिला कॉलेज, हिंगणघाट), दिव्यानी वाळके (नबीरा कॉलेज), तन्वी देढे (शिवाजी सायंस कॉलेज), मृणालिका कुंभारे (वायसीसी अभियांत्रिकी कॉलेज).

## कलोडे महाविद्यालयाने पटकाविले विजेतेपद आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन हँडबॉल पुरुष स्पर्धेतील अंतिम फेरीत प्राचार्य अरुणराव कलोडे महाविद्यालयाने सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाचा पराभव करीत स्पर्धेतील विजेतेपद प्राप्त केले. रवी नगरातील विद्यापीठाच्या क्रीडा मैदानावर स्पर्धेतील अंतिम लढत रविवारी पार पडली. अंतिम सामन्यात कलोडे महाविद्यालयाने सीपी अँड बेरार महाविद्यालयाचा २०-१८ अशा गोलने पराभव केला. विजयी संघाकडून शाहरुख नदाफने सर्वाधिक ८ तर नाविण्य कोचेने सहा आणि वेदांत पंचबुद्धे व अनिकेत जाधवने प्रत्येकी तीन गोलचे योगदान दिले. पराभूत संघाकडून आकाश दुर्गेने सर्वाधि सहा तर विनायक पाटील, अभय खोडेने प्रत्येकी पाच व आकाश काटकरने दोन गोलचे योगदान दिले.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत कोराडीच्या तायवाडे महाविद्यालयाने बाजी मारली. सामन्यात १५-१० अशा गोलने तायवाडे संघाने सेंट विन्सेंट पलोटी कॉलेजचा पराभव केला. सामन्यात तायवाडे महाविद्यालयाच्या प्रणय पिंगळेने सर्वाधिक आठ गोल तर सुजल मिसाळने पाच व अमन खिंचेने दोन गोल केले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांच्यासह कौशल्य विकास अधिकारी शैलेश भगत, डॉ. आय. एस. रंधावा, डॉ. नितीन जंगीटवार, डॉ. संजय कडूस्कर, डॉ. निशांत तिपटे, डॉ. अश्लेषा नागपूरे, सागर गुप्ता, अनिल चौहान, आदर्श वाकोडे, डॉ. धीरज भोसकर आदी उपस्थित होते.





## महारोगाजगार मेळाव्यात कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांचे दालन
## आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे आयोजन

महाराष्ट्र शासनातर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरात नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने रोजगार व रोजगाराच्या संधी यावर भर देण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे नमो महारोजगार मेळाव्यात विविध कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांचे दालन विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उघडण्यात आले. मेळाव्यामध्ये आलेल्या असंख्य विद्यार्थ्यांनी विद्यापीठात चालनाऱ्या विविध अभ्यासक्रमांची माहिती जाणून घेतली. कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या विविध रोजगाराच्या संधीची माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध असल्याची माहितीसुद्धा देण्यात आली. या दालनाद्वारे विद्यापीठ स्तरावर सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी कौशल्यधिष्ठित उपक्रमाचे महत्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतले. आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, विद्यापीठाचे प्रशिक्षण व रोज़गार अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी उपक्रमाबाबत सदिच्छा व्यक्त केल्या. विभागाचे संचालक डॉ. निशिकांत राऊत यांनी सविस्तर माहिती दिली. विभागाचे सहा. संचालक डॉ. समित माहोरे, विभागातील प्रकल्प अधिकारी डॉ. अमित झपाटे आणि निलेश उईके व प्रितेश शिरसुदे यांनी आयोजनात महत्वाची भूमिका बजावली. याप्रसंगी विविध अभ्यासक्रमांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये राष्ट्रीय अग्निसुरक्षा अभियांत्रिकी संस्था (NAFS) चे संजय बावणे, मंगेश निनावे, श्री साई समर्थ शैक्षणिक व मेडिकल सोसायटी संस्थेचे तेजस जोशी, वेदिक (VEDIC)(VDIH) चे माधवी मॅडम, नेक्सस इन्फोसेक चे सय्यद मुमताज हे उपस्थित होते. पुढील उपक्रमासाठी मा. कुलगुरु महोदयांनी सदिच्छा व्यक्त केल्या.



## आयडीसीपीई महाविद्यालयाला विजेतेपद
## आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या महिलांच्या आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत दमदार खेळाच्या जोरावर ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय- आयडीसीपीई संघाने अंतिम सामन्यात धनवटे नॅशनल कॉलेजचा पराभव करीत स्पर्धेतील विजेतेपद प्राप्त केले. जेसीपीई, हिंगण्याच्या मैदानावर ही स्पर्धा पार पडली.

स्पर्धेतील अंतिम सामन्यात आयडीसीपीई संघ सुरुवातीपासूनच आक्रमक भुमिकेत होता. सामन्यात दहाव्याच मिनिटाला विजयी संघाच्या बलवंती खुजूरने पहिला गोल सामन्यात १-० अशी आघाडी घेतली. यानंतर काही वेळाने ३४ व्या मिनिटाला खुजूरने संघासाठी आणि वैयक्तिकरित्या दुसरा गोल करीत सामन्यात २-० अशी आघाडी संघाला मिळवून दिली. पहिल्या मध्यांतरापर्यंत हीच गोलसंख्या कायम राहिली. मध्यांतरानंतर सुरु झालेल्या खेळात डीएनसी संघाचे खेळाडू गोल करण्यासाठी बरेच प्रयत्न केले, परंतु ते अपयशी ठरले आणि आयडीसीपीईने विजेतेपदावर शिक्कामोर्तब केला.

तत्पूर्वी झालेल्या उपांत्यफेरीच्या लढतीत आयडीसीपीईने दयानंद आर्या कॉलेजला टायब्रेकरमध्ये ४-१ अशा गोलने नमवित अंतिम फेरीत प्रवेश केला. आयडीसीपीईच्या प्रेरणास्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शारदा नायडू यांच्या मार्गदर्शनात तसेच क्रीडा प्रशिक्षक पीयूष खोपे यांच्या प्रशिक्षणामुळे तब्बल ९ वर्षाने आयडीसीपीईने आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. विजेत्या संघाने आपल्या यशाचे मार्गदर्शक डॉ. नायडू आणि प्रशिक्षक पीयूष खोपे यांना दिले आहे.





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात विकसित भारत @२०४७ कार्यक्रम

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात विकसित भारत @२०४७ कार्यक्रम सोमवार, दिनांक ११ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०.१५ वाजता घेण्यात आला. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात भारताचे माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने यावेळी संबोधित केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

'विकसित भारत संकल्प यात्रे'च्या निमित्ताने प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासह देशभरातील विविध ठिकाणी नागरिकांशी दृकश्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधला. दि.१५ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत 'विकसित भारत संकल्प यात्रे'चे संपूर्ण देशभरात आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या कार्यक्रमात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, आंतर विद्याशाखीय अभ्यासविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांच्यासह विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.




### विद्यापीठ इतिहास विभागात एक दिवसीय व्याख्यान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभागात सोमवार, ११ डिसेंबर २०२३ रोजी सह - अभ्यासक्रम उपक्रमअंतर्गत "झिरो माइल ऑफ इंडिया" या विषयावर श्री. प्रवीण योगी (वरिष्ठ तांत्रिक अधिकारी ,पोलीस विभाग नागपूर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. इतिहास विभागाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला अध्यक्ष विभागातील प्रा. राम कोरेकर होते.

नागपूर शहरातील दुर्लक्षित वस्तूंच्या संशोधनातून एक नवीन माहिती शहराच्या इतिहासात जोडली जाऊ शकते असे मत इतिहास अभ्यासक श्री. प्रवीण योगी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कोरेकर यांनी आपल्या भाषणात नागपूरच्या सभोवतालच्या प्रदेशातील सांस्कृतिक वास्तुवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता विभाग प्रमुख डॉ. श्यामराव कोरेटी यांचे विशेष सहकार्य लाभले. त्याचबरोबर विभागातील प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाचे संचालन रणजीत सोनवणे यांनी केले तर आभार प्रा.अशोक नैताम यांनी मानले.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाची घोषणा पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या अधिपत्याखाली १४ ते १८ डिसेंबर दरम्यान आयोजित होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाची घोषणा नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन हॉलीबॉल स्पर्धेतून या संघाची निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाचा व्हॉलीबॉल संघ पुढीलप्रमाणे- साहिल वाभितकर, निखिल भस्मे, अक्षय चौधरी (तिन्ही एडी कॉलेज, भारसिंगी), अभिनंदन खामनकर, साहिल गौरकर (दोघे बॅरि. वानखेडे कॉलेज, खापरखेडा), ओम भोसले (एसबी जैन कॉलेज), सौरव शर्मा (साकेत शारी. शिक्षण महाविद्यालय), अमन चौहान (एनपी देव धरमपेठ कॉलेज), दर्शन किनेकर (प्रियदर्शनी कॉलेज), शुभम मुलनकर, यश कोडमलवार (दोघे हरीभाऊ आदमने कॉलेज, सावनेर), तुषार तालंगी (एसएसएनजे कॉलेज, देवळी). राखीव खेळाडू- साहिल कुमार (जेसीपीई कॉलेज), सुधांशू पांडे (सिटी प्रियर कॉलेज), अजय कटरे (एडी कॉलेज भारसिंगी), राजेश सुरेश, राकेश कुमार (दोघे साकेत शारी. शिक्षण कॉलेज, गोंदिया), अथर्व उमाठे (एनपी देव धरमपेठ कॉलेज), तुषार दानव (हरीभाऊ आदमने कॉलेज) यांचा समावेश आहे.



# नागपुरात साकार होणार महाराष्ट्रातील पहिले मल्टीस्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियम

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शताब्दी महोत्सव निमित्त निर्मिती



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने सरकारने दिलेल्या शंभर कोटी रुपयांच्या निधीमधून महाराष्ट्रातील पहिले मल्टी स्टोरी मल्टी परपज इनडोअर स्टेडियम साकार होणार आहे. रवी नगरातील विद्यापीठ क्रीडा संकुल परिसरातील सुभेदार हॉलच्या मागे भव्य असे इनडोवर स्टेडियम लवकरच निर्माण होणार आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी याबाबत पीपीटीद्वारे संपूर्ण माहितीचा आढावा घेतला.

नागपूरसह विदर्भातील खेळाडूंना सर्वोत्तम सुविधा मिळाव्या म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विविध सुविधांमध्ये भर पडावी म्हणून शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारने विद्यापीठाला शंभर कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. यातील ४४ कोटी रुपयांमधून महाराष्ट्रातील पहिले मल्टी स्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियम क्रीडा संकुल परिसरात साकार होणार आहे. महाराष्ट्र सरकार कडून मल्टी स्टोरी मल्टीपरपज इनडोअर स्टेडियम करिता २० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्याने लवकरच या कामास सुरुवात होणार आहे. या स्टेडियम करिता विद्यापीठाने आर्किटेक म्हणून आनंद सारडा यांची नियुक्ती केली आहे. तांत्रिक समितीमध्ये विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, अर्जुन व द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त श्री विजय मुनेश्वर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्षा घुसे, उपअभियंता अतुल गोटे, आर्किटेक्ट आनंद सारडा विद्यापीठ अभियंता नितीन विश्वकार, उपअभियंता महेंद्र पाटील यांचा समावेश आहे. या तांत्रिक समितीच्या देखरेखीखाली महत्त्वकांक्षी असे इनडोअर स्टेडियम निर्माण होणार आहे.

**दहा खेळांच्या घेता येणार स्पर्धा-** विद्यापीठ परिसरात निर्माण होणारे मल्टी स्टोरी मल्टी परपज इनडोअर स्टेडियम दहा खेळांकरिता राहणार आहे. १० खेळांच्या रात्र -दिवस स्पर्धा घेता येणार असून सरावा करिता देखील इनडोअर स्टेडियम उपलब्ध राहणार आहे. बास्केटबॉल, हँडबॉल, टेबल टेनिस, जिम्नॅस्टिक, इनडोअर कबड्डी, जुडो, वूशू, बॅडमिंटन, स्वॅश, कुस्ती आदी खेळांच्या सुविधा या इनडोअर स्टेडियममध्ये राहणार आहे.

**बास्केटबॉल -हँडबॉल स्पर्धा इनडोअर -** बास्केटबॉल तसेच हँडबॉल खेळाच्या स्पर्धा या स्टेडियम मुळे इनडोअर घेता येणार आहे. दिवस तसेच रात्रीच्या वेळेस स्पर्धा घेण्याची सुविधा या स्टेडियम मध्ये राहणार आहे. त्यामुळे येथील खेळाडूंना मोठा वाव मिळणार आहे. तिसऱ्या मजल्यावर बॅडमिंटन स्पर्धेकरिता सुविधा राहणार आहे.

**खेळाडूंचे राहणार म्युरल्स -** मल्टी स्टोरी मल्टी परपज इनडोअर स्टेडियममध्ये दहा खेळांच्या सुविधेसह कॅफेटेरिया, मीटिंग हॉल, कॉन्फरन्स हॉल, प्रशासकीय कार्यालय, जिम्नॅशियम, भव्य पार्किंग परिसर राहणार आहे. सोबतच स्टेडियममध्ये अर्जुन, द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त खेळाडूंचे तसेच आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडूंचे म्युरल्स लावले जाणार आहे.

---

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राजन यादवला रौप्यपदक रिया, तेजस्विनीने पटकाविले कांस्यपदक

## अ. भा. व पूर्व-पश्चिम- उत्तर विभागीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धा

भुवनेश्वर, ओडिशा येथील कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रीयल टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या अधिपत्याखाली सुरु असलेल्या पूर्व-पश्चिम- उत्तर विभागीय आंतरविद्यापीठ पुरुषांच्या ॲथलेटिक्स स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राजन यादवने रौप्यपदक प्राप्त केले. तर अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला ॲथलेटिक्स स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रिया दोहतरे आणि तेजस्विनी लामकाने यांनी कांस्यपदक प्राप्त केले आहे.

पूर्व- उत्तर- पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुरुषांच्या गटात ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात राजन यादवने रौप्यपदक आपल्या नावे केले. राजनने ८ मि. ४९.६८ अशी वेळ देत हे यश प्राप्त केले. तर त्याचा सहकारी सौरभ तिवारीने ८ मि. ५३.५८ अशी वेळ देत चौथे स्थान प्राप्त केले. प्रथम स्थान गुरु काशी विद्यापीठाच्या रवीने तर तिसरे स्थान पंजाबच्या सौरभने प्राप्त केले. राजन आणि सौरभने आत्तापर्यंतचे सर्वोत्कृष्ट प्रदर्शन या स्पर्धेत केले आहे. आंतर महाविद्यालयीन स्टीपलचेस स्पर्धेत नोंदविलेल्या वेळेपेक्षाही सरस कामगिरी या स्पर्धेत या दोघांनी नोंदविली. या कामगिरीच्या जोरावर राजन व सौरभ हे दोन्ही खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरले आहे.

महिलांच्या ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या रिया दोहतरेने कांस्यपदक प्राप्त केले. रियाने १० मि. २२.८८ अशी वेळ देत हे यश प्राप्त केले. प्रथम स्थान श्री गुरुगोविंद विद्यापीठाच्या नवेली लहाणूने तर द्वितीय स्थान बारकतुल्ला विद्यापीठाच्या मंजू यादवने प्राप्त केले. स्पर्धेतील रियाचे हे दुसरे कांस्यपदक आहे. रियाने १५०० मीटर धावण्यात ४ मि. ३०.४० अशी वेळ देत कांस्यपदक प्राप्त केले होते. २१ किमी अर्धमॅराथॉनमध्ये नागपूरच्या तेजस्विनी लामकानेने १ तास १७ मि. अशी वेळ देत कांस्यपदक प्राप्त केले. या कामगिरीच्या जोरावर रिया ही खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.

नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी केलेल्या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. तर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आदींनी खेळाडूंचे अभिनंदन करीत त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.





## विद्यापीठात आयटी सेल कक्षाचे उद्‌घाटन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील दुसऱ्या माळ्यावर नव्याने नूतनीकरण करण्यात आलेल्या आयटी सेल कक्षाचे उद्‌घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते बुधवार, दिनांक १३ डिसेंबर २०२३ रोजी पार पडले. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील ग्रामगीता भवन येथे पूर्वी आयटी सेल कक्ष कार्यरत होता. हा कक्ष जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील दुसऱ्या माळ्यावर नूतनीकरण करून सुरू करण्यात आला आहे. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव्य विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा डॉ. प्रशांत कडू, आयटी सेल कक्षाचे संचालक डॉ. सतीश शर्मा, नोडल ऑफिसर डॉ.






## समाजाला संतांवरील श्रद्धेपेक्षा विचारांवर जगण्याची नितांत गरज - डॉ. अविनाश आवलगावकर
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंत व्याख्यानमाला

समाजाला संतांवरील श्रद्धेपेक्षा विचारांवर जगण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शताब्दी महोत्सव निमित्ताने आयोजित राष्ट्रसंत व्याख्यानमाला बुधवार, दिनांक १३ डिसेंबर २०२३ रोजी पार पडली. स्नातकोत्तर मराठी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून ते मार्गदर्शन करीत होते.

संत कोणाला म्हणावे याचे उदाहरण देत मुक्ताबाईंनी 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' त्याचप्रमाणे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांनी संतांची व्याख्या केल्याचे डॉ. आवलगावकर यांनी पुढे बोलताना सांगितले. समाजाने संतांना अंधश्रद्धेच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. समाजातील अज्ञान अद्यापही दूर झाले नसून त्यांना अजूनही संत कळले नाही, याची खंत व्यक्त करीत डॉ. आवलगावकर यांनी संतांची मूल्ये समाजामध्ये रुजविणे गरजेचे असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यापीठाने राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे १२ पुष्प आणि शताब्दी अंतर्गत १०० व्याख्यानांचे आयोजन केल्याची माहिती दिली. संत साहित्यावर संशोधन करताना त्याचा समाजाच्या विकासासाठी उपयोग व्हावा असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी करून दिला. मानव्य विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार जयश्री देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला प्राधिकारणी सदस्य, अधिष्ठाता, विविध शैक्षणिक विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.





# अमेरिकेतील विद्यापीठांसोबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ करणार सामंजस्य करार

## अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासातील सल्लागार माइक हँकी यांची विद्यापीठाला भेट

अमेरिकेतील विद्यापीठांसोबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ सामंजस्य करार करणार आहे. अमेरिकेतील विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, संशोधनाबाबत विनिमय कार्यक्रम राबविता यावा याबाबत चर्चा करण्याकरिता अमेरिकन वाणिज्य दुतावासातील सल्लागार श्री माईक हँकी यांनी गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी विद्यापीठाला भेट दिली. औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. ए. के. डोरले सभागृहात श्री माईक हँकी यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात आयोजित बैठकीत श्री माइक हँकी यांनी भारत व अमेरिका या दोन्ही देशातील शैक्षणिक क्षेत्रात सहयोग वाढविण्याबाबत चर्चा केली. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य मंडळ संचालक डॉ. राजेश सिंह, आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्मिता आचार्य, औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वंदना धुर्वे यांची उपस्थिती होती. यावेळी श्री माईक हँकी यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम त्याचप्रमाणे विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. अमेरिकेतील विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या दरम्यान शिक्षण, विद्यार्थी, शिक्षक, संशोधन यासह विविध पातळीवर कशाप्रकारे आदान- प्रदान करता येईल याबाबत चर्चा केली. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राबविण्यात येत असलेल्या ग्राम चलो अभियान (रिचिंग टू अनरीच्ड) त्यांनी समजून घेतले. अमेरिकेतील सामाजिक संस्थांच्या मदतीने ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्यासाठी सहकार्य करणे त्याचप्रमाणे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ट्वीन डिग्री प्रोग्रामबाबत त्यांनी विशेष करून चर्चा केली.

संवाद साधताना एकविसाव्या शतकातील सायबर सिक्युरिटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासह विविध समस्यांची माहिती त्यांनी दिली या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी दोन्ही देशातील विद्यापीठांचे सहकार्य महत्त्वपूर्ण राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. विविध क्षेत्रांमध्ये महिलांची भागीदारी वाढविणे गरजेचे आहे. नवनवीन क्षेत्रांमध्ये महिलांना संधी मिळत आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे आणखी नवीन संधी निर्माण होणार आहे. सोबतच कार्यस्थळी महिलांना योग्य वातावरण मिळावे यासाठी भारतात कार्यरत अमेरिकन कंपन्यांसोबत चर्चा करणार असल्याचे ते म्हणाले.




## तन्मय, आयुष, आदित्य, आरुषी, मनस्वीने पटकाविले सुवर्णपदक
## आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन तलवारबाजी स्पर्धेत पुरुष गटात तन्मय धनंजय, आयुष साहू, आदित्य सेलोकर यांनी तर मुलींच्या गटात आरुष सिंग, मन्सवी शेंडे, राशी मिश्रा यांनी प्रतिस्पर्धीला मात देत स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले.

सदर मधील अंजूमन गर्ल्स डिग्री कॉलेज येथे ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेत फॉईल पुरुष गटात पारशिवनीच्या महात्मा गांधी कॉलेजच्या तन्मय धनंजयने जेएम पटेल भंडारा महाविद्यालयाचा जय भोयरला अंतिम फेरीत ५-२ ने मात देत सुवर्णपदक प्राप्त केले. त्यामुळे दुसऱ्या स्थानी जयला समाधान मानावे लागले.

इपी प्रकारात आयएम महाविद्यालयाच्या आयुष साहूने बीएम भिवापूरच्या भुनेश नागोसेला ५-० ने नमवित बाजी मारली. साबरे प्रकारात शिवाजी सायंस विद्यालय नागपूरच्या आदित्य सेलोकरने रामकृष्ण वाघ कला-वाणिज्य महाविद्यालय कोराडीच्या पारस मांडवकरचा ५-४ ने पराभव करीत स्पर्धेत अजिंक्य राहण्याचा मान प्राप्त केला.

महिला गटात फॉईल प्रकारात हिस्लॉपच्या आरुष सिंगने भिवापुर महाविद्यालयाच्या हिमानी घोडमारेचा ५-० ने धुव्वा उडवित सुवर्णपदक प्राप्त केले. इपी प्रकारात एलएडी कॉलेजच्या मनस्वी शेंडेने पारशिवनीच्या एमजी कॉलेजच्या सेजल घोडबैल हिला ५-२ ने नमवित सुवर्णयश प्राप्त केले. साबरे प्रकारात एलएडी कॉलेजच्या राशी मिश्राने तिचीच सहकारी आयुम शेखला ५-३ अशा गुणांनी मात देत सुवर्णयश प्राप्त केले.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्‌घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अंजूमन कॉलेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनीस अहमद यांनी भुषविले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. संजय चौधरी, डॉ. नवीन मुंगळे, डॉ. आदित्य सोनी, प्राचार्य अंजूम खान, डॉ. सोनाली शिरभाते, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. सायमा सिद्दीकी आदी उपस्थित होते. याप्रसंगी स्पर्धेतील विजेत्यांना पदक देउन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. सायमा सिद्धीकी, मो. शोएब आदी उपस्थित होते.




## दलित -आदिवासीच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी नवीन कायद्याची गरज
## युजीसीचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखदेव थोरात यांचे प्रतिपादन
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे व्याख्यान

भारतीय संविधानाने समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असला तरी दलित- आदिवासी समाजाबाबत अजूनही भेदभाव दिसून येत आहे. त्यांच्या समस्या वेगळ्या असल्याने सर्वांसाठी सामान धोरण राबविणे योग्य नाही. म्हणूनच दलित -आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी प्रत्येक क्षेत्राकरिता नवीन कायदा आणावा लागेल, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखदेव थोरात यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन महाराज बाग येथील दीक्षांत सभागृहात गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. थोरात बोलत होते.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले तर अध्यासन प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले उपस्थित होते. 'महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची आर्थिक व सामाजिक स्थिती : उभरत्या प्रश्नांचे विश्लेषण' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. सुखदेव थोरात यांनी स्थावर संपत्ती, उद्योगधंदा, शिक्षण या आधारे दलित व आदिवासी समाज देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील भेदभाव अनुभवत असल्याचे सांगितले. मागासवर्गीय समाजातील नागरिकांचा आर्थिक विकास सरकारी धोरणे असताना देखील अपेक्षेप्रमाणे झाला नाही. सोबतच सामाजिक भेदभाव होत असल्याचे त्यांनी जातीनिहाय जनगणनेच्या सरकारी आकडेवारीच्या पावर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे समजावून सांगितले.

व्याख्यानमालेचे प्रास्ताविक करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी आयोजनामागील भूमिका मांडली व प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. व्याख्यानमालेचे अध्यक्षीय भाषण करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी डॉ. थोरात यांनी उपलब्ध करून दिलेला डाटा संशोधकांकरिता अत्यंत उपयोगी असल्याचे सांगितले. संचालन विजयकांत पाणबुडे यांनी केले तर आभार कल्पना मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राधिकारणी सदस्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




## लीळाचरित्र मराठी साहित्याची जननी - डॉ . अविनाश आवलगावकर
## महानुभाव साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

महानुभावांनी मराठीतील आद्य साहित्यनिर्मिती केली असून लीळाचरित्र मराठी साहित्याची जननी असल्याचे मत जेष्ठ साहित्यिक डॉ. अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केले. भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व अखिल भारतीय महानुभाव विचार चिंतन परिषद, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित दोन दिवसीय महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ मदन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

कै. डॉ. पुरूषोत्तमदादा नागपूरे - कारंजेकर विचारमंच, श्रीमद् महावाक्य प्रवचन स्थळी पिपळा हुडकेश्वर, नागपूर येथे ग्रंथदिंडी काढण्यात आली. ग्रंथदिंडीत मराठीचा आद्यग्रंथ लीळाचरित्र सप्त ग्रंथ रुक्मिणीस्वयंवर, शिशुपाळवध, उद्धवगीता, वछाहरण, सह्याद्रि-माहात्म्य, ऋद्धिपुरवर्णन, ज्ञानप्रबोध ठेवण्यात आले होते. उद्घाटन प्रसंगी डॉ. मदन कुलकर्णी यांनी मराठी साहित्यात महानुभाव साहित्य सर्वोच्च असल्याचे मत व्यक्त केले. उद्घाटन समारंभाध्यक्ष राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी चक्रधर स्वामींचे विचार अध्यासनामार्फत तळागाळापर्यन्त पोहचविले जाईल, असे मत व्यक्त केले. कार्याध्यक्ष आचार्य महंत श्री न्यायंबासबाबा शास्त्री यांनी महाराष्ट्रातील महानुभाव संप्रदाय आणि इतर संप्रदाय यांचा तुलनात्मक अभ्यास होऊन वारंवार तत्त्वज्ञानाची बैठक होणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. विशेष अतिथी मानव्य विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी आदिवासी साहित्य हे लीळा चरित्रातून निर्माण झाल्याचे मत व्यक्त केले. स्वागताध्यक्ष श्री.अजय ढवंगाळे यांनी सर्वांचे स्वागत केले. या उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन नागपूरचे अध्यासन प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री, संचालन डॉ. विजया राऊत व आभार श्री सुरेश वाइन्देशकर यांनी केले. या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाला मोठ्या प्रमाणात साहित्यरसिकांनी उपस्थिती दर्शवली होती.






## विद्यापीठ महिला वस्तीगृहात लिंगभेद जनजागृती - महिला पंधरवाडा निमित्याने आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला वसतीगृहामध्ये महिला पंधरवडा निमित्ताने लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचाराबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दिनांक ९ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३ बद्दल ची माहिती त्याचप्रमाणे कायद्याची पार्श्वभूमी सांगून मुलींमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

महिला वस्तीगृहामध्ये आयोजित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, वक्त्या डॉ. शिखा गुप्ता, महिला वसतीगृहाच्या वरिष्ठ अधिक्षिका डॉ. रिता वडेतवार, अधीक्षिका सरोज लांजेवार यांची उपस्थिती होती. " कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ( मनाई, प्रतिबंध, निवारण कायदा २०१३)" या विषयावर प्रमुख भक्तांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रास्ताविक डॉ. रिता वडेटवार यांनी केले. या कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत कडू यांनी कायद्याची सहजता व मुलींच्या करिअरवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या वक्त्या डॉ. शिखा गुप्ता यांनी मुलींना " कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ( मनाई , प्रतिबंध, निवारण) कायदा २०१३ " या विषयावर माहिती दिली. तसेच कायद्याचे महिला संदर्भात जागरूकता, कायद्याची गरज का पडली ? कायदा कश्याप्रकारे लागू झाला याची सविस्तर माहिती सांगितली. कायद्यासंदर्भात फार महत्वाचे मुलींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन वसतीगृहाची विद्यार्थिनी कु. जानवी मंजुळे ने केले तर आभार सरोज लांजेवार यांनी मानले.




## रामटेक येथे रेशीम शेती, मत्स्यपालन, मशरूम शेती, मधमाशी पालन केंद्र सुरू
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव अंतर्गत रामटेक येथील ताई गोळवलकर महाविद्यालयात रेशीम शेती, मत्स्यपालन, मशरूम शेती, मधमाशी पालन केंद्र उद्घाटन सोहळा गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता पार पडला. रामटेक येथील ताई गोळवलकर महाविद्यालय आणि कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासन यांच्या पुढाकाराने ग्राम चलो अभियान अंतर्गत अशा प्रकारचे केंद्र प्रथमच सुरू करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला मुख्य अतिथी व उद्घाटक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, विशेष अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय तांत्रिक सल्लागार सीएसबीआर डॉ. सुरेश रैना, विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या सदस्या डॉ. कल्पना पांडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सव कक्ष अध्यक्ष डॉ. संतोष कसबेकर, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सुरेश रैना यांनी केंद्राद्वारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कशा पद्धतीने आपला उद्योग वाढवता येईल. यात महाविद्यालयाची भूमिका काय राहील व विद्यापीठ कशा पद्धतीने त्यांना मदत करेल याबाबत माहिती दिली. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या सदस्या डॉ. कल्पना पांडे यांनी रोजगार न मागता रोजगार देणारा विद्यार्थी कसा बनेल यात विद्यापीठाचा कौशल्य विभाग कशी मदत करू शकेल यावर मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यापीठांतर्गत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्याचप्रमाणे रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाची गरज आणि उपलब्ध असलेल्या संधी या बाबत मार्गदर्शन केले. ताई गोळवलकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश शिंगरू यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.




# विद्यापीठाचा व्हॉलीबॉल संघ अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत केली दमदार कामगिरी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या अधिपत्याखाली घेण्यात आलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने दमदार कामगिरी केली आहे. याच कामगिरीच्या जोरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा व्हॉलीबॉल संघ अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेकरीता पात्र ठरला असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाने एकूण सहा लढती खेळल्या. या सर्वच लढतीत प्रतिस्पर्धीवर विद्यापीठ संघाने पूर्णपणे आपले वर्चस्व निर्माण केले होते. पहिल्या सामन्यात संघाने गोव्याला २५-१७, २५-१४, २५-१६ ने तर दुसऱ्या लढतीत विद्या विहार विद्यापीठ मुंबईला २५-१४, २५-१४, २५-११ ने तिसऱ्या लढतीत पारुल विद्यापीठ, बडोद्याला २६-२४, २५-२१, २५-२२, २५-११, १५-१३ ने नमवित विजयी हॅट्रीक नोंदविली. त्यानंतरच्या लढतीत नागपूर विद्यापीठ पुरुष संघाने बिकानेरच्या महाराजा गंगासिंग विद्यापीठाला २५-१८, २५-१५, २५-५ ने सिकरच्या पं. दीनदयाल उपाध्याय शेखावत विद्यापीठाला २८-३०, २१-२५, २५-२३, २५-२३, १५-१३ ने आणि शेवटच्या लढतीत राजस्थान विद्यापीठाला २५-२३, २५-१४, २५-१५ ने नमवित सहापैकी सहाही सामन्यात विजय नोंदविण्याची कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, शेवटच्या राजस्थान विरुद्धच्या लढतीत आंतरराष्ट्रीय खेळाडू दुशंत रामअवतार जाखड हा राजस्थान संघात असताना देखील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने या संघाचा पराभव स्पर्धेत विक्रमी कामगिरी केली आहे. याच कामगिरीच्या जोरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघ कुरुक्षेत्र येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे. संघाने प्रशिक्षक डॉ. राजेंद्र राऊत व व्यवस्थापक अमित खांडेकर यांच्या मार्गदर्शनात हे यश प्राप्त केले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाने मिळविलेल्या या विक्रमी यशाबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी त्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघात- साहिल वाभितकर, निखिल भस्मे, अक्षय चौधरी(तिन्ही एडी कॉलेज, भारसिंगी), अभिनंदन खामनकर, साहिल गौरकर(दोन्ही बॅरि. वानखेडे कॉलेज, खापरखेडा), ओम भोसले(एसबी जैन कॉलेज), सौरव शर्मा(साकेत शारी. शिक्षण महाविद्यालय), अमन चौहान(एनपी देव धरमपेठ कॉलेज), दर्शन किनेकर(प्रियदर्शनी कॉलेज), शुभम मुलनकर, यश कोडमलवार(दोन्ही हरीभाऊ आदमने कॉलेज, सावनेर), तुषार तालंगी(एसएसएनजे कॉलेज, देवळी). राखीव खेळाडू-साहिल कुमार(जेसीपीई कॉलेज), सुधांशू पांडे(सिटी प्रियर कॉलेज), अजय कटरे(एडी कॉलेज भारसिंगी), राजेश सुरेश, राकेश कुमार(दोन्ही साकेत शारी. शिक्षण कॉलेज, गोंदिया), अथर्व उमाठे(एनपी देव धरमपेठ कॉलेज), तुषार दानव(हरीभाऊ आदमने कॉलेज) यांचा समावेश आहे.





# विद्यापीठात सॉफ्ट स्किल, व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा - रोजगार व प्रशिक्षण विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी सॉफ्ट स्किल व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन प्राणीशास्त्र विभागातील सभागृहात सोमवार दिनांक १८ डिसेंबर ते शनिवार दिनांक २३ डिसेंबर २०१३ पर्यंत करण्यात आले आहे. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) अंतर्गत आयोजित ही कार्यशाळा ३६ तासांची राहणार आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वर्षा धुर्वे, भारतीय प्राचीन संस्कृती व पुरातत्व विभागप्रमुख डॉ. प्रबास साहू, प्रशिक्षण व रोजगार अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेमध्ये स्वतःची क्षमता, व्यक्तिमत्व विकास, औद्योगिक आस्थापनांना मुलाखतीकरिता आवश्यक असलेले निकष, योग्यरीत्या माहितीचे आदान

प्रदान, उत्कृष्ट बायोडाटा तयार करणे इत्यादी विषयाची माहिती देण्यात येणार आहे. या कार्यशाळेत प्राणीशास्त्र विभाग, प्रवास, पर्यटन, पुरातत्त्व विभाग आणि गृह विज्ञान विभागातील ७० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे. ही कार्यशाळा ग्लोबल टॅलेंट ट्रॅक या शैक्षणिक संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेली आह. प्रास्ताविक डॉ. भूषण महाजन यांनी केले. या कार्यशाळेचे महत्व विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने दैनंदिन जीवनात आणि येणाऱ्या प्रसंगी कसे वापरता येईल याबाबत डॉ. स्मिता आचार्य आचार्य यांनी मार्गदर्शन केले. ग्लोबल टॅलेंट ट्रॅक प्रशिक्षक हिमांशू खोब्रागडे यांनी विद्यार्थ्यांना या कोर्सची पूर्ण विस्तारित माहिती दिली.



## स्कोपसवर एकाच सत्रात डॉ. संजय ढोबळे यांचे १०० संशोधन लेख प्रसिद्ध
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला मिळाला बहुमान

विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचा संशोधन लेखन डेटा स्कोपसवर उपलब्ध असतो. स्कोपस डेटा नुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाची गुणवत्ता ठरते. याच स्कोपसवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक तथा जागतिक स्तरावर २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश असलेले डॉ. संजय जानराव ढोबळे यांचे एकाच शैक्षणिक सत्रात तब्बल १०० संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन करताना संशोधक आंतरराष्ट्रीय स्तरावर स्कोपसवरील डेटाचा आधार घेतात. संशोधन कार्य करीत असताना आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्कोपसवर आपला संशोधन पेपर प्रसिद्ध व्हावा, असे प्रत्येक संशोधकाचे स्वप्न असते. यासाठी ते संशोधक अहोरात्र प्रयत्न करतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील जागतिक स्तरावरील २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये समावेश असलेले डॉ. संजय जानराव ढोबळे यांचे १ जानेवारी २०२३ ते आज पर्यंत तब्बल १०० संशोधन पेपर एकाच शैक्षणिक सत्रात स्कोपसवर प्रसिद्ध झाले आहे. स्कोपसवर डॉ. ढोबळे यांचे एकूण ९१२ संशोधन पेपर प्रसिद्ध झाले असून त्याचे सायटेशन ११,८८७ तर एच-इंडेक्स ४६ आहे. गुगल स्कॉलरमध्ये सायटेशन १४,३४३, एच- इंडेक्स ५० तर १०-इंडेक्स हा ४२३ एवढा आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्कोपसमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात संशोधन पेपर प्रसिद्ध होणे हा महाराष्ट्र तसेच विदर्भामध्ये एक प्रकारचा मोठा शैक्षणिक रेकॉर्ड आहे. मोठ्या प्रमाणात संशोधन कार्याबाबत विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ओमप्रकाश चिमणकर यांनी डॉ. संजय ढोबळे यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. संजय ढोबळे हे एलएडी रेडिएशन, डोसूमेंट्री, सोलर सेल आधी पदार्थावर संशोधन कार्य करतात. महाराष्ट्र सरकारचा महत्वकांक्षी असलेल्या समृद्धी महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी त्यांनी नाविन्यपूर्ण मॉडेल सादर केले आहे. डॉ. संजय ढोबळे यांनी त्यांच्या यशाचे श्रेय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील सर्व अधिकारी, संशोधक विद्यार्थी व सहसंशोधकांना दिले आहे.




## 'सुकून' मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागाच्या वतीने 'सुकून' या मानसिक आरोग्य जनजागृती अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रम अंतर्गत समुपदेशन करणाऱ्या विविध स्टॉलचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या हस्ते सोमवार, दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले. यावेळी मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिना खान, डॉ. सुबोध बनसोड उपस्थित होते.

विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील पी. व्ही. नरसिंहराव ग्रंथालय समोर पदव्युत्तर मानसशास्त्र विभागाच्या वतीने विविध प्रकारचे १६ स्टॉल्स लावण्यात आले आहे. या स्टॉल्समध्ये भावनात्मक, सुरक्षा, त्याचप्रमाणे आपण काम का टाळतो, संशोधन करताना आपण चुकतो, शिवाय विविध समस्यांना सामोरे जातो, याचे मानसिकदृष्ट्या समाधान स्टॉलच्या माध्यमातून विद्यार्थी शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शनिवारी विद्यापीठ परिसरात सुकून फेरी काढली. याच कार्यक्रमाच्या अंतर्गत पथनाट्य देखील आयोजित करण्यात आले. जागृती शुक्ला, अविनाश अरोरा, अभिषेक उरकुडे, पुष्पराज तिवारी, ऋतिका सोनटक्के, कोमल नागूरकर, कल्पक हटकर, महेश उमाटे, जयंती जोशी व जीजस रंगारी या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आंतर महाविद्यालयीन पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. स्टॉल्स मध्ये या पोस्टरचे प्रदर्शन देखील भरविण्यात आले आहे. या ठिकाणी भेट देणाऱ्या नागरिकांकडून पोस्टरचे मूल्यांकन करीत त्याद्वारे क्रमांक दिला जाणार आहे. मंगळवार दिनांक २९ डिसेंबर रोजी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन कार्यक्रमाला विभागातील शिक्षक प्रा. अंजन माहेश्वरी, डॉ. विवेक बांबल, प्राजक्ता जोशी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती अध्यक्ष तनया अरकाटकर, अभिषेक उरकुडे, नरेंद्र सिंग, ए.पी. अमन, जीजस रंगारी, धनिशा गडे, जागृती शुक्ला, मुकेश तितरे, भक्ती ठाकरानी, लिसा पाटील, खुशी सनक, स्मिता मोहितकर आदी विद्यार्थी प्रयत्न करीत आहे.




## पाहण्याचा दृष्टिकोन बदला जीवन बदलेल
## मानसोपचार तज्ज्ञांनी व्यक्त केली भावना
## पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात चर्चासत्र

प्रत्येक छोट्या -मोठ्या समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला त्यामुळेच जीवनात बदल घडेल अशी भावना मानसोपचार तज्ज्ञांनी व्यक्त केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मानसशास्त्र विभागाच्या वतीने 'मानस-शास्त्रार्थ' या चर्चासत्राचे आयोजन मानव्यशास्त्र विभागातील सभागृहात मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमात मानसोपचार तज्ज्ञांनी विविध प्रश्नांवर चर्चा करीत समाधान केले.

मानस-शास्त्रार्थ या चर्चासत्राला प्रमुख अतिथी म्हणून मानसोपचार तज्ञ डॉ. सुधीर भावे, विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शामकुवर, आरबीईटी मानसोपचार तज्ञ योगिता मदान व जोहरा मास्टर यांची उपस्थिती होती. मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती व लैंगिक छळ या विषयावर आयोजित चर्चासत्रामध्ये मानसोपचार तज्ञांनी यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. दैनंदिन कार्यावर लक्ष न देता व्यसनावर अधिक लक्ष देणे हा एक प्रकारे मानसिक आजार असल्याचे चर्चासत्रात डॉ. सुधीर भावे यांनी सांगितले. मुले व्यसनाधीनतेकडे वळू नये म्हणून पालकांनी अधिक लक्ष देण्याची गरज डॉ. सरोज शामकुवर यांनी व्यक्त केली. अतिविचार केल्याने व्यसनांच्या आहारी जाण्याची भीती असते. त्यामुळे त्यापासून सुटका करण्याचा प्रयत्न करा, असे त्यांनी सांगितले. सोबतच यावेळी विविध मानसिक आजारांच्या लक्षणाबाबत त्यांनी माहिती दिली. स्त्री व पुरुषांमधील मानसिक आजाराचे प्रमाण, सामाजिक स्तर याबाबत विस्तृत विवेचन केले. मानसिक समस्या आढळून आल्यास तातडीने समुपदेशन घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना देखील मानसोपचार तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे दिली. या कार्यक्रमाचे आयोजन समन्वयक तथा मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिना खान, सहसमन्वयक डॉ. सुबोध बनसोड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राजक्ता जोशी यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.





## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या क्रिकेट संघाची घोषणा
## अ.भा. आंतरविद्यापीठ कुलगुरु टी २० क्रिकेट स्पर्धा २६ पासून देशातील ३० विद्यापीठाचे संघ सहभागी होणार

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुलगुरु चषक टी २० क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद यंदा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ भुषविणार आहे. २६ डिसेंबर २०२३ ते ६ जानेवारी २०२४ दरम्यान नागपूरातील विविध क्रिकेट मैदानावर हे क्रिकेटचे सामने रंगणार आहे. स्पर्धेत देशातील तब्बल ३० विद्यापीठाचे क्रिकेट संघ सहभागी होणार असून सुमारे ५०० क्रिकेटपटूंचा यात समावेश राहणार आहे.

नागपुरातील डीएनसी, आरपीसीई, तायवाडे कॉलेज, झुलेला इन्स्टि., एसबी सिटी मैदानावर क्रिकेटचे सामने रंगणार आहे. याच निमित्ताने विद्यापीठाच्या आयोजन समितीच्या वतीने सक्करदरा येथील एसबी सिटी मैदानाची पाहणी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, डॉ. आदित्य सोनी, डॉ. संजय चौधरी आदी उपस्थित होते. स्पर्धेतील उद्‌घाटनीय आणि समारोपीय सामना एस. बी.सिटी मैदानावर रंगणार आहे. या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे दोन संघ सहभागी होणार असून या संघाची घोषणा नुकतीच करण्यात आल्याची माहिती डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

नागपूर विद्यापीठ अ संघ- दुर्गेश बैस, ईश्वर कुटे, सुरज सुर्यवंशी, रितेश पुरकाम, मनीष ठाकरे, निलेश रोटके, महेंद्र बनकर, समीर दाणे, वैभव गावंडे, रमेश शेवारे, निनाद राउत, दीपक घोडमारे, अक्षय राउत, धीरज पाठक. संघ व्यवस्थापक दिनेश दखने, प्रशिक्षक- नितीन पालकर. ब संघ- नितीन खरबडे, मनीष फुलझेले, राकेश कोपूलवार, अजिंक्य बोबडे, रितेश कांबळे, दिव्येश शेंडे, सुशील मोकलवार, विजय इंगळे, विनय पडोळे, सचिन जांबुतकर, शैलेश फुलझेले, संदीप थापा, आनंद मेश्राम, स्वप्नील मोडक. व्यवस्थापक- दर्पण गजभिये, प्रशिक्षक - डॉ. राहूल खराबे.



## विद्यार्थ्यांनी अनुभवले विधिमंडळाचे कामकाज पदव्युत्तर विधी विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागातील विद्यार्थ्यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचे कामकाज अनुभवले. विद्यार्थ्यांना संसदीय कार्यपद्धतीची माहिती व्हावी म्हणून पदव्युत्तर विधी विभागाच्या वतीने बुधवार, दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

राज्यातील कायदेमंडळ असलेल्या विधिमंडळाचे कामकाज त्याचप्रकारे महत्त्वाच्या समकालीन कायदेशीर समस्यांवर कशाप्रकारे चर्चा केली जाते. याची माहिती मिळविणे हा या शैक्षणिक भेटीचा उद्देश होता. या भेटीचे आयोजन पदव्युत्तर विधी विभागाच्या प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी केले होते. प्रश्नोत्तराचा तास सुरू असताना विभागातील विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश मिळाला. विधिमंडळाचे प्रतिनिधित्व करणारे (आमदार) विधिमंडळ सदस्यांकडून राज्यातील वैद्यकीय पायाभूत सुविधांशी संबंधित गंभीर मुद्द्यावर चर्चा केली जात होती. आमदारांकडून सुरू असलेल्या गंभीर मुद्द्यावरील चर्चे दरम्यान विद्यार्थ्यांना विधिमंडळाचे कामकाज बघता आले. विभागातील एलएलएमचे ७० पेक्षा अधिक विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विभागातील शिक्षक कु. ऋचा कोचर, कु. शिवानी खंडाते आणि कु. पद्मा घटामे यांनी यशस्वीपणे भेटीचे संयोजन केले.




## अर्थचक्र प्रवर्तन ही काळाची गरज - डॉ. शैलेंद्र लेंडे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या ग्रंथाच्या शताब्दी वर्षानिमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी भारतीय समाजाच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्राबद्दल मौलिक विचारांचे पुनरावलोकन केले. त्यावर आधारित अर्थचक्र प्रवर्तन ही काळाची गरज असल्याची मांडणी केली. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून अर्थशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी बालू वनकर तसेच विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विभागातील प्रकल्प अधिकारी डॉ. अमित झपाटे उपस्थित होते त्यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौद्रीक विचार आणि आजच्या काळातील त्याची उपयोगिता व समर्पकता यावर आपले विचार प्रकट केले. कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे उपस्थित होते. त्यांच्या शुभ हस्ते समाजशास्त्र विभागातील समाजकार्य विषयात आचार्य पदवी संपादन करणाऱ्या प्राध्यापिका डॉ. पूनम निमजे आणि डॉ. राजश्री रामटेके यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक बोरकर यांनी केले. प्रास्ताविक नीता जगताप आणि आभार आम्रपाली कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.




## गुजरातमधील स्पर्धेत 'हिक्सा' स्टार्टअपला पुरस्कार इलेक्ट्रिक वाहनाबाबत रिस्क-५ स्पर्धेत यश

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या इंक्युबेशन सेंटर मधील स्टार्टअपला गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे झालेल्या स्पर्धेत आय-क्रिएट पुरस्कार प्राप्त झाला आहे. इलेक्ट्रिक वाहनाबाबत असलेल्या रिस्क ५ स्पर्धेत स्टार्टअपच्या पथकाने यश संपादन केल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बहुमानात भर पडली आहे.

विद्यार्थ्यांच्या संशोधनाला चालना मिळावी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली इंक्युबेशन सेंटर सुरू करण्यात आले आहे. या इनक्युबॅशन सेंटरमध्ये समाजातील गरजा लक्षात घेता विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपकरणे तयार केले जात आहे. याच इनक्युबेशन सेंटरचा एक भाग असलेला हिक्सा टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड या स्टार्टअप पथकाने रिस्क ५ या नाविन्यपूर्ण प्रोसेसर निर्मिती स्पर्धेत सहभाग घेतला होता. नाविन्यपूर्ण प्रोसेसर निर्माण करण्याची स्पर्धा भारत सरकार आणि गुजरात राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आय-क्रिएट अहमदाबाद यांच्या वतीने घेण्यात आली होती.

**रिस्क ५ -** आर्किटेक्चरवर विकसित करण्यात आलेल्या दिग्दर्शक हरीश झांबानी आणि अतुल घुमाडे यांच्यासह हिक्सा टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे परिणाम म्हणून ब्लॅक बॉक्सला त्याच्या अतुलनीय नवकल्पना आणि उत्कृष्टतेबद्दल प्रशंसा मिळाली आहे. भारताने रिस्क ५ आधारित प्रोसेसर आणि चिपवर सिस्टर्न बनविण्यात महत्त्वपूर्ण प्रगती केल्याने हे यश सहयोगी सहाय्याचे महत्त्व अधोरेखित करते, आयआयटी मद्रास सारख्या संस्था अशा प्रगतीचे संवर्धन करण्यात निर्णायक भूमिका बजावत आहेत. हे उल्लेखनीय आहे की, हिक्सा टेक्नॉलॉजीस हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथील इंक्युबेशन सेंटर मधील स्टार्टअप आहे. विद्यार्थ्यांना संशोधनासाठी योग्य वातावरण त्याचप्रमाणे उपकरण उपलब्ध या इंक्युबेशन केंद्रातून करून दिली जातात. इंनक्युबेशन केंद्रातून सुलभ केलेली सहयोगी इकोसिस्टम हिक्सा सारख्या नाविन्यपूर्ण कंपन्यांसाठी उत्प्रेरक असल्याचे सिद्ध झाले आहे. जे मेक इन भारत मिशनमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

आय-क्रिएट उपक्रम, उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने त्याचप्रमाणे हिक्सा तंत्रज्ञान आणि इतर सहभागींना पुढे नेण्यात भूमिका बजावली आहे. टेलिमॅटिक्स व्यवसाय धोरणे परिष्कृत करणे आणि तंत्रज्ञानातील प्रगती स्पर्धेत आघाडीवर असल्याचे सुनिश्चित करीत शिबिरात मार्गदर्शकांनी अमूल्य मार्गदर्शन केले. गुजरात राज्यातील मिळालेल्या यशामुळे पथकातील सदस्य हरीश झांबानी व अतुल घुमडे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सिव्हिल लाईन्स छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील इंक्युबेशन विभागाचे आभार मानले. रिस्क ५ प्रकारात आय- क्रिएट पुरस्कार पटकाविल्याने हरीश जांबानी व अतुल घुमडे यांचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, आयआयएल संचालक डॉ. राजेश सिंह, इनक्युबॅशन केंद्राचे संचालक डॉ. अभय देशमुख यांनी अभिनंदन केले.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघाची घोषणा पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

छत्तरपूर, मध्य प्रदेशच्या महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठाच्या अधिपत्याखालील २५ डिसेंबर पर्यंत रंगणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघाची घोषणा नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने नुकतेच घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतून विद्यापीठ संघाची घोषणा करण्यात आली. नागपूरचा महिला संघ स्पर्धेसाठी रवाना झाला आहे. विद्यापीठ संघ पुढीलप्रमाणे- जोत्स्ना, विधी, प्रांजल, सलोनी (सर्व जेसीपीई नागपूर), हर्षिता निलेकर, क्षितीजा साखरकर, मंगला राउत(सर्व एसएसएनजे, देवळी), मुस्कान लोखंडे (एडी कॉलेज भारसिंगी), मृणाल वावगे (जीवन विकास महाविद्यालय, समुद्रपूर), श्वेता रत्नपारखी (प्रियदर्शनी कॉलेज, नागपूर), काजल (एमडब्ल्यूएसएस, कामठी), मंगला डाबले(आर्ट्स कॉलेज सिहोरा). राखीव खेळाडू- यास्मीन (एसबी सिटी कॉलेज), डिंपल पंचभाई (नुतन आदर्श महाविद्यालय, उमरेड), साक्षी खोब्रागडे (कमला नेहरु महाविद्यालय), हर्षा चारलीवार (एसएसएनजे, देवळी), कल्याणी मलगम (यशवंत महाविद्यालय, सेलू), रेणूका वानखेडे (डॉ. आदमने कॉलेज, सावनेर).



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या फुटबॉल संघाची घोषणा
## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ फुटबॉल

आयटीएम विद्यापीठ, ग्वाल्हेर यांच्या अधिपत्याखाली २२ ते २६ डिसेंबरदरम्यान आयोजित होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिलांच्या फुटबॉल स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाची घोषणा क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी आणि तज्ज्ञ समितीच्या वतीने करण्यात आली.

स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघ रवाना झाला आहे. विद्यापीठ संघ पुढीलप्रमाणे- शालिनी रंगारी, माधुरी भोयर (एमएमडी कॉलेज, गोंदिया), मालविया टेंभुर्णे (झुलेलाल इन्स्टि.), महिमा पांडे, रंजना कुशवाह, श्रुती कोलते (आयडीसीपीई), निधी वर्मा, स्नेहा उईके, सेजल सोनारे, वेदिका मौर्य (सर्व हिस्लॉप कॉलेज), मयुरी मराठे (वसंतराव नाईक), रुचिका शंभरकर (आरएस बिडकर कॉलेज, हिंगणघाट), रितीका बनसोडे, शिखा कलाकोटी (एनटीसीपीई), नम्रता चंदेल (जीएस कॉमर्स कॉलेज, वर्धा), आश्विनी जामदार (तायवाडे कॉलेज, कोराडी), मेहक बानो शेख (डीबी सायंस महाविद्यालय), महक शेख (डीएनसी नागपूर), प्रक्षिाक कुंटलवार (विद्या विकास महाविद्यालय), ऐश्वर्या बुधे (श्री चक्रधर कला, वाणिज्य-विज्ञान कॉलेज, गोंदिया). राखीव खेळाडू- भुमिका देशभ्रतार (एसएसएमव्ही), तुलसी कैथवास (एनएमडी कॉलेज गोंदिया), शाशिष्ठा बेंगरा, विशाखा राउत (आयडीसीपीई), काजल भजनकर (पीडब्ल्यूएस कॉलेज), धनश्री शेरपुरे (वैनगंगा अभियांत्रिकी कॉलेज), आचल मौर्य(हिस्लॉप कॉलेज), वैष्णवी खानझोडे (जीएस बॉलेज वर्धा), रिया शर्मा (प्रेरणा कॉलेज), ज्ञानदा वानखेडे (आरएस बिडकर कॉलेज), काजल वरथी (केडीके महाविद्यालय, नागपूर).

## 'महात्मा गांधी एक बहुआयामी व्यक्तिमत्व' विषयावर व्याख्यान
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभागाचे आयोजन





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर तत्त्वज्ञान विभागात बुधवार, दि. २० डिसेंबर २०२३ रोजी "एम.के. गांधी: एक बहुआयामी व्यक्तिमत्व" या विषयावर विशेष व्याख्यान पार पडले. पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग प्रमुख डॉ. प्रमोद वाटकर यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आंतर विद्याशाखीय अभ्यासक्रम विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी भूषविले.

तत्त्वज्ञान विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. धीरज कदम यांनी आपल्या प्रास्ताविकेत या व्याख्यानाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. प्रमोद वाटकर यांनी आपल्या व्याख्यानात महात्मा गांधी यांचा 'बालपण ते महात्मा' हा जीवन प्रवास अतिशय रोचक पद्धतीने रेखाटतांनाच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडून सांगितले. अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात आज जागतिक कल्याणासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारे स्वीकारण्यात आलेली १७ शाश्वत विकास लक्ष्ये ही कशाप्रकारे गांधींच्या तत्वज्ञानात प्रतिबिंबित हे दाखून दिले. सत्य, अहिंसा आणि आचारातील साधेपणा हाच सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनाच्या विकासाचा शाश्वत मार्ग असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले. संचालन कु. धनश्री पात्रीकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय कु. प्रिया कपूर व पवन उईके यांनी केले तर आभार डॉ. चंद्रकांत सोनावणे यांनी मानले. या कार्यक्रमाला तत्त्वज्ञान विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. सुरेंद्र गायधने, डॉ. सुनिता इंगळे, डॉ. अपर्णा समुद्र, तसेच तत्त्वज्ञान व अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.




## विद्यापीठाने शिक्षणासह खुले केले रोजगार दालन - माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

### विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने शिक्षणासह विद्यार्थ्यांना रोजगार देणारे मोठे दालन खुले केले असल्याचे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासनाचा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या महाराज बाग येथील छत्रपती शिवाजी महाराज शैक्षणिक परिसरातील दीक्षांत सभागृहात पंडित दीनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन करताना डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

विभागीय रोजगार मेळावा उद्घाटनिय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे उपायुक्त श्री. प्रकाश देशमाने, विद्यापीठ रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, कौशल्य विकास अधिकारी ज्योती वासुरकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. पूर्वी केवळ अभियांत्रिकी, व्यवस्थापन व फार्मसी आदी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले जात असल्याचे सांगत प्र-कलगुरु डॉ. दुधे यांनी विद्यापीठाने बीए बीकॉम, बीएससी व अन्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा म्हणून प्लेसमेंट सेल सुरू केल्याचे सांगितले.

कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त श्री. प्रकाश देशमाने यांनी मनोगत व्यक्त करताना कंपन्यांची मागणी पूर्ण व्हावी याकरिता रोजगार मेळाव्याचे आयोजन केल्याचे सांगितले. स्थानिक उद्योग त्याच प्रकारे कंपन्यांच्या मागणीनुसार मनुष्यबळ मिळावे म्हणून विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्त करून देण्याचे कार्य देखील विभागाकडून होत आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद देशमुख यांनी केले तर आभार विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी मानले कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला-पुरुष संघाची घोषणा पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धा



एमजीएम विद्यापीठ संभाजीनगर येथे २३ ते २६ डिसेंबरदरम्यान घेण्यात येणाऱ्या पश्चिम विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाची घोषणा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी नुकतीच केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने सदर मधील अंजूमन मुलींच्या महाविद्यालयात नुकतीच पुरुष व महिला गटाची तलवारबाजी स्पर्धा घेण्यात आली, त्यातूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाची घोषणा करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी दोन्ही संघ रवाना झाले आहे. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. अजय अग्रवाल, शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. आदित्य सोनी, दिनेश दखणे, क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दोन्ही संघाला भेटून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.

**विद्यापीठाचा पुरुष संघ-** फॉईल प्रकार- तन्मय सावरकर (महात्मा गांधी महाविद्यालय, पारशिवनी), जय भोयर (जेएम पटेल, भंडारा), जीवनदीप क्षीरसागर (बॅरि. वानखेडे कॉलेज), तुषार बनकर (डीआरबी सिंधु महाविद्यालय). इपी प्रकार- आयुष शाहू (इंदूताई शारी. शिक्षण कॉलेज), भुनेश नागोसे, चेतन वाकेकर (भिवापूर महाविद्यालय), आर्यन मेश्राम (डॉ. मोटघरे कॉलेज, कोंढा). साबरे- आदित्य सेलोकर (शिवाजी सायंस नागपूर), पारस मांडवकर (रामकृष्ण वाघ कॉलेज), मयंक चौहाण (डॉ. आंबेडकर कॉलेज), तेजस कुरंजेकर (केआयटीएस, रामटेक). राखीव खेळाडू- आकाश बनकर (डीबी सायंस कॉलेज), अमरजीत सिंग (एम. देशमुख नागपूर), मयूर निमजे (एमजी कॉलेज, पारशिवनी).

**महिला संघ-** ईपी प्रकारात- मनस्वी शेंडे (एलएडी कॉलेज), स्वेजल गाडबैल (एजी कॉलेज), यामिनी ढगे (जीएस कॉलेज, वर्धा), इलियम अख्तर (अंजूमन अभियांत्रिकी कॉलेज). साबरे- राशी मिश्रा, अंजूम शेख (एलएडी कॉलेज), झुबिया फिरदोस (अंजूमन गर्ल्स कॉलेज), इशिका येंप्रेड्डीवार (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय). फॉईल- आरुषी सर सिंग (हिस्लॉप कॉलेज), हिमानी घोडमारे, निलोफर पठाण, तन्नू डुंबरे (भिवापुर महाविद्यालय). राखीव खेळाडू- मेघा गिरडकर (श्याम किशोर कॉलेज), अशिता (डीबी सायंस, गोंदिया), वैदेही राजूरकर (एलएडी कॉलेज)

## श्रीनिवास रामानुजन भारतीय ज्ञान परंपरेचे वाहक
## वैदिक गणिततज्ञ श्री सुनील पाटणकर यांचे प्रतिपादन
## विद्यापीठ हिंदी विभागात राष्ट्रीय गणित दिवस




जगातील महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन हे भारतीय ज्ञान परंपरेचे वाहक होते, असे प्रतिपादन वैदिक गणिततज्ञ श्री सुनील पाटणकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा पदव्युत्तर हिंदी विभाग आणि शिक्षण संस्कृती उत्थान न्यास महाराष्ट्र प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय गणित दिवसानिमित्त शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित कार्यक्रमात पाटणकर बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, व्याख्याते श्री. सुनील पाटणकर, हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे उपस्थित होते.

'भारतीय ज्ञान परंपरा आणि रामानुजन' या विषयावर पुढे बोलताना श्री पाटणकर यांनी गणित तज्ञाच्या रुपाने रामानुजन यांनी मानव समाजाला दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. रामानुजन यांनी जीवनातील न सुटलेले अनेक प्रमेय सिद्ध करून दाखवित जगाला भारतीय ज्ञान - विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले आहे. यावेळी प्रमुख अतिथी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे यांनी मार्गदर्शन करताना वर्तमान काळात सर्व क्षेत्रात गणिताला अधिक महत्त्व असल्याचे सांगितले. एकप्रकारे तंत्रज्ञानाची संपूर्ण कार्यप्रणाली ही गणितीय भाषेवर टिकून आहे. मानवतेच्या विकासात या विषयाला फार महत्त्व असल्याचे डॉ. साबळे यांनी सांगितले. प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी भारतीय ज्ञान परंपरेत गणित विषयाचे अनन्यसाधारण महत्त्व असून श्रीनिवास रामानुजन यांनी भारतीय ज्ञान संपदेचा जगाला बोध करून दिल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. दामोदर द्विवेदी यांनी केले तर आभार सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे यांनी मानले. यावेळी डॉ. सुमित सिंह, डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. एकादशी जैतवार, डॉ. कुंजन लिल्हारे, प्रा. जागृती सिंह, प्रा. दिशांत पाटील, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. रूपाली हिवसे यांच्या सह विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यापीठाचा महिला फुटबॉल संघ उपांत्यपूर्व फेरीत
## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धा



ग्वाल्हेर येथील आयटीएम विद्यापीठाच्या यजमान पदाखाली सुरू असलेल्या पश्चिम विभागीय फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ महिला संघाने दमदार खेळाच्या जोरावर उप उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

स्पर्धेत पहिल्याच लढतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघाने राजस्थान विद्यापीठाचा ९-० ने धुव्वा उडविला. स्नेहा उइके ने सर्वाधिक चार तर ऐश्वर्या ने तीन आणि मालविका व मेहकने प्रत्येकी एक गोल केला. दुसऱ्या लढतीत केबीसीएनएम चा ४-० ने पराभव केला. उपउपांत्य पूर्व फेरीत छिंदवाडा येथील राजा शंकर शहा विद्यापीठ विरुद्ध झालेल्या लढतीत नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने २-० अशा गोलने विजय नोंदवित आगेकूच कायम ठेवली आहे. सामन्यात सुरुवातीपासून दोन्ही संघाच्या खेळाडूंनी गोल करण्यासाठी प्रयत्न केले. मात्र यश राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघालाच मिळाले. सामन्यात २५ व्या मिनिटाला स्नेहा उईकेने गोल नोंदवत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर काही वेळाने ४२ व्या मिनिटाला मेहक शेखने गोल करीत २-० अशी आघाडी नागपूर विद्यापीठाला मिळवून दिली. हीच आघाडी शेवटपर्यंत कायम राहिल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संघ विजयी ठरला. या विजयासह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने उप उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. नागपूर विद्यापीठाची पुढील सामना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाविरुद्ध होणार आहे. विद्यापीठाच्या या कामगिरीबद्दल विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी विद्यापीठ संघाचे अभिनंदन केले आहे.






## नागपूरला 'स्पोर्ट सिटी' बनविण्यात क्रिकेटचे योगदान
## -माजी रणजी कर्णधार श्री सुहास फडकर यांचे प्रतिपादन
## कर्मचाऱ्यांची अ. भा. आंतर विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धा

नागपूरला क्रीडा नगरी बनविण्यात क्रिकेटचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन माजी रणजी कर्णधार श्री. सुहास फडकर यांनी केले. विद्यापीठ कर्मचाऱ्यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धा 'कुलगुरू चषक' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात आली आहे. कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा सक्करदरा येथील श्री बिंझाणी नगर महाविद्यालय येथे मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता पार पडला. यावेळी स्पर्धेचे उद्घाटन करताना श्री. फडकर बोलत होते.

कार्यक्रमाची अध्यक्षता विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केली तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, माजी रणजी कर्णधार श्री. सुहास फडकर, नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. मोहित शहा, अधिसभा सदस्य डॉ. संजय चौधरी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. धनंजय वेळुकर, श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित मेत्रे, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन झाल्याचे घोषित करीत श्री. सुहास फडकर यांनी नागपूर ही 'स्पोर्ट सिटी' असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी आगामी काळात क्रिकेटवर विद्यापीठ विशेष लक्ष देणार असल्याचे सांगितले. विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने या अखिल भारतीय विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केल्याचे सांगितले. संचालन प्राचार्य डॉ. सोनाली शिरभाते यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

### देशभरातील ५०० क्रिकेटपटूंचा सहभाग

स्पर्धेत देशातील तब्बल ३० विद्यापीठाचे क्रिकेट संघ सहभागी असून सुमारे ५०० क्रिकेटपटूंचा यात समावेश राहणार आहे. नागपुरातील धनवटे नॅशनल कॉलेज, आरपीसीई, तायवाडे कॉलेज, झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग, एसबी सिटी का ॅलेज, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नागपूर शारीरिक शिक्षण, सेंट मॅरी, ज्योतिबा का ॅलेज मैदानावर क्रिकेटचे सामने रंगणार आहे. स्पर्धेत दिल्ली, हिसार, अमरावती, हरयाणा, पंजाब, रोहतक, मुंबई, नांदेड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, परभणी, जम्मू काश्मीर, लुधियाना, चंदीगड, शिमला, रामटेक, औरंगाबाद, सोलापूर, गोरखपूर, हैदराबाद आणि नागपूर आदी विद्यापीठाचे संघ स्पर्धेत सहभागी होणार आहेत. डॉ. देवेंद्र वानखेडे, डॉ. संजय चौधरी, डॉ. अजय गावंडे, सनी पांडे, अतुल वानखेडे, डॉ. अमरकांत चकोले, राणी रेवतकर, डॉ. सुनील भोतमांगे, डॉ. आदित्य सोनी, डॉ. सुरेंद्र तिवारी हे या मैदानाचे प्रमुख आहे.

### संयोजन समिती सदस्यांचा सत्कार

उद्घाटन या कार्यक्रमात अखिल भारतीय अंतर्गत विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या संयोजन समिती सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यामध्ये माजी विद्यापीठ कर्मचारी श्री. सुधाकर पाटील, नवी दिल्ली विद्यापीठ बोर्ड मेंबर डॉ. आदिल अहमद, जम्मू विद्यापीठ बोर्ड मेंबर श्री राजेश सलहोत्रा, मुंबई विद्यापीठ बोर्ड मेंबर श्री दीपक घोणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील श्री. दिनेश दखणे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.





## रोमहर्षक सामन्यात बोर्ड एकादशचा एका धावेने विजय - अखिल भारतीय आंतरविद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धा

शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानाखाली विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ टी-२० 'कुलगुरू चषक' क्रिकेट स्पर्धेस मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर २०२३ पासून सुरुवात झाली आहे. पहिल्या दिवशी खेळल्या गेलेल्या रोमहर्षक सराव सामन्यामध्ये बोर्ड एकादश संघाने चौधरी चरणसिंह हरियाणा कृषी विद्यापीठ संघाला एका धावेने पराभूत करीत विजय प्राप्त केला.

सक्करदरा येथील श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाच्या क्रिकेट मैदानावर झालेल्या सराव सामन्यामध्ये बोर्ड एकादश संघाने २० शतकात ९ बाद २१५ धावा काढल्या. या धावांचा चांगला पाठलाग करताना हरियाणा कृषी विद्यापीठाच्या संघाने ५ बाद २१४ धावांपर्यंत मजल मारली. मात्र एका धावेने पराभव स्वीकारावा लागला. प्रथम फलंदाजी करताना बोर्ड एकादस संघातील नरेंदर शिलक यांनी ५ चौकार आणि ५ षटकाराच्या मदतीने २१ चेंडू ५७ धावा काढल्या तर तरुणनेदेखील चांगली साथ देत ३३ चेंडूत ५७ धावा काढल्या. हरियाणा कृषी विद्यापीठाच्या डॉ. विनय अहलावत यांनी सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. या धावांचा पाठलाग करताना हरियाणा कृषी विद्यापीठ हिसारच्या संघाने उत्कृष्ट फलंदाजी केली. दीपक कुमार यांनी ३१ चेंडूत ४ चौकार २ षटकारासह एकूण ५७ धावा काढल्या. अखेरच्या चेंडूपर्यंत सामन्यातील सस्पेन्स कायम होता. अखेर एका धावेने बोर्ड एकादश संघाने हा सामना जिंकला. हिसार विद्यापीठाचे डॉ. विनय अहलावत यांना प्लेयर ऑफ द मॅच हा अवॉर्ड देण्यात आला.




## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाला कांस्यपदक अ. भा. आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी ठरले पात्र

एमजीएम विद्यापीठ, संभाजी नगर येथे घेण्यात आलेल्या पश्चिम विभागीय तलवारबाजी स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला संघाने कांस्यपदक प्राप्त केले. याशिवाय इतर खेळाडूंनी देखील दमदार कामगिरी करीत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

स्पर्धेत मुलींच्या संघाने फॉईल प्रकारात कांस्यपदक प्राप्त केले. विजयी संघात हिस्लॉप कॉलेजच्या आरुषी सिंग, भिवापूर महाविद्यालयाच्या हिमानी घोडमारे, निलोफर पठाण, तन्नू डुंबरे यांचा समावेश आहे. याशिवाय साबरे प्रकारात देखील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुली अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत. यात राशी मिश्रा, अंजूम शेख- दोन्ही एलएडी तर इशिका येंप्रेड्डीवार- यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, झुबिया फिरदोस- अंजूमन कॉलेज यांचा समावेश आहे. इपी प्रकारात देखील महिला संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. यात एलएडी कॉलेजची मनस्वी शेंडे, एमजी कॉलेजची स्वेजल गाडबैल, जीएस कॉलेजची यामिनी ढगे, अंजूमन कॉलेजची इहुमा अख्तर यांचा समावेश आहे. फॉईल व इपी प्रकारात मुलांचा संघही अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. यात भुनेश नागोसे, चेतन वाकेकर दोन्ही भिवापूर कॉलेज, आर्यन मेश्राम- अरुण मोटघरे कॉलेज, आयुष शाहू- इंदूताई कॉलेज, तन्मय सावरकर- महात्मा गांधी कॉलेज, जय भोयर- जेएम पाटील कॉलेज, जीवनदीप क्षीरसागर- बॅरि. वानखेडे कॉलेज, तुषार बनकर- डीआरबी सिंधू महाविद्यालय यांचा समावेश आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी केलेल्या या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी समाधान व्यक्त केले आहे. तर या कामगिरीबद्दल विद्यापीठाचे माननीय कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी अभिनंदन करीत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वीर बाल दिवस संपन्न

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात वीर बाल दिवस संपन्न झाला. वीर बाल दिवस हा श्री गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादास बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांच्या हौतात्म्याचे प्रतीक आहे. साहिबजादांच्या साहस आणि धैर्याची लहान थोरांना माहिती होण्यासाठी सरकार देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहे. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात साहिबजादास बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांच्या प्रतिमेला सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक श्री. गणेश कुमकुमवार यांनी माल्यार्पण केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील यूडीसी श्री. शैलेश राठोड, योगेश केवटे, रुपेश आत्राम, कवडू भोयर, अनिल खरे, आसिफ शेख, कार्तिक हरडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.





## नांदेड, अकोला, संभाजीनगर, मुंबई, जळगाव, नाशिक विद्यापीठाची विजयी सलामी
## रोहतक विद्यापीठाचे राज कुमार यांची ९४ धावांची सर्वोत्तम खेळी
### अखिल भारतीय आंतर विद्यापीठ टी-२० क्रिकेट स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचाऱ्यांची टी-२० क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेतील पहिलाच दिवस महाराष्ट्रातील नांदेड, अकोला, संभाजीनगर, मुंबई, जळगाव व नाशिक विद्यापीठांनी गाजवला. नागपूर येथील माफसू विरुद्ध यमडीयू रोहतक विरुद्ध झालेल्या सामन्यात रोहतकच्या राज कुमार यांनी ९४ धावा काढत दिवसभरातील सर्वोत्तम खेळी केली आहे. पहिल्या दिवशी चार गटामधील संघाचे एकूण १३ सामने खेळण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व बीएएमयू संभाजीनगर यांच्या दरम्यान झालेल्या लढतीत बीएएमयू संभाजीनगर संघाने ७ विकेट्सने विजय प्राप्त केला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या संघाने प्रथम फलंदाजी करीत ८ बाद १४३ धावा काढल्या. यामध्ये विनायक शिंदे यांनी ५२ धावांची सर्वोत्तम खेळी केली. या धावांचा पाठलाग करताना १८.४ षटकांमध्येच बीएएमयू संभाजीनगर संघाने ३ बाद १४४ अशी धावा काढत विजय प्राप्त केला. विजयी संघाकडून जय देशमाने यांनी सर्वाधिक ४० धावा काढल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठावर महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाने २ धावांनी विजय मिळविला. सोलापूर विद्यापीठाने २० षटकांमध्ये ८ बाद १३२ धावा काढल्या. यामध्ये सर्वाधिक सुनील थोरात यांनी ५० धावा काढल्या. मात्र आरोग्य विद्यापीठ नाशिकने २ धावांनी हा सामना जिंकला. वायसीएमओयू नासिक व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या दरम्यान झालेला सामना नांदेड विद्यापीठाने ३ विकेट्सनी जिंकला. वायसीएमओयू नासिक संघाने प्रथम फलंदाजी करीत ९ बाद १०९ धावा काढल्या. यात संदीप भागवत यांनी सर्वाधिक ४८ धावा काढल्या. याचा पाठलाग करीत नांदेड विद्यापीठाने १६ षटकात ७ बाद ११० धावा काढत विजय प्राप्त केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ (टीम बी) व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला दरम्यान झालेला सामना कृषी विद्यापीठाने ९ खेळाडू राखत जिंकला. प्रथम फलंदाजी करीत नागपूर विद्यापीठाने १६.५ षटकात १० बाद ८६ धावा काढल्या. अकोला विद्यापीठाने १०.२ षटकातच १ बाद ८७ धावा पूर्ण करीत सामना जिंकला. या सामन्यामध्ये अकोला संघातील सचिन इंगळे यांनी २.५ षटकात केवळ ८ धावा देत पाच बळी टिपले तर विवेक सतार यांनी नाबाद ४७ धावांची खेळी करीत विजय मिळवून दिला. जम्मू विद्यापीठाविरोधात झालेला सामना मुंबई विद्यापीठाने दोन धावांनी जिंकला. मुंबई विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करीत १०

बाद १४४ अशी धावसंख्या उभारली. जम्मू विद्यापीठाच्या संघाने शेवटच्या क्षणापर्यंत सामन्यात रोमांच कायम ठेवत २० षटकात ८ बाद १४२ धावा केल्या. मात्र, जम्मू संघाचा दोन धावांनी पराभव झाला. जळगाव विद्यापीठाने ७ गडी राखत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा पराभव केला. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करीत सर्व बाद ११५ धावा काढल्या. या धावांचा पाठलाग करीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संगाने १२.१ षटकात ३ बाद ११७ धावा काढत विजय प्राप्त केला.

माफसू नागपूर विरुद्ध एमडीयू रोहतक विद्यापीठ संघाने १५३ धावांनी विजय मिळविला. रोहतक विद्यापीठ संघाने प्रथम फलंदाजी करीत २ बाद २१३ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये कॅप्टन राजकुमार यांनी सर्वाधिक नाबाद ९४ धावांची खेळी केली. त्यांना दीपक कुमार यांनी नाबाद राहत ४४ धावांची साथ दिली. २१३ धावांचा पाठलाग करताना माफसू नागपूरचा संघ १३.२ षटकातच सर्व बाद ६० धावांवर गारद झाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुद्ध खेळत हिमाचल प्रदेश विद्यापीठाने एका धावेने विजय प्राप्त केला. प्रथम फलंदाजी करीत हिमाचल विद्यापीठाने सर्व बाद ७२ धावा काढल्या. तर पुणे विद्यापीठाला १४.४ षटकातच सर्व बाद ७१ धावांवर रोखण्यात हिमाचल प्रदेश विद्यापीठाला यश आले. केंद्रीय विद्यापीठ हरियाणा विरुद्ध झालेल्या सामन्यात चौधरी चरणसिंह हरियाणा कृषी विद्यापीठ हिसारने ९४ धावांनी विजय प्राप्त केला. हरियाणा कृषी विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करीत सर्व बाद १६४ धावा काढल्या. केंद्रीय विद्यापीठ हरियाणा चा संघ सर्व बाद ७० धावा काढू शकला. कृषी विद्यापीठ हरियाणाचा संघातील नवदीप कैरोन यांनी ४ षटकात ५ बळी टिपले. शेर-ए- काश्मीर कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ जम्मू विरुद्ध दिल्ली विद्यापीठाने ६ विकेट्सने सामना जिंकला. दिल्ली विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करीत ४ बाद १२५ धावा काढल्या. या धावांचा पाठलाग करताना शेर-ए- काश्मीर कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ जम्मू संघ २० षटकात ६ बाद १२२ धावा काढू शकला. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेकने प्रथम फलंदाजी करीत ६ बाद ७२ धावा काढल्या. पंजाब विद्यापीठ चंदिगढने ७.१ षटकात ७४ धावा काढत १० विकेट्सने सामना जिंकला. मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठ हैदराबाद विरुद्ध झालेला सामना पंजाब कृषी विद्यापीठ लुधियानाने ७ विकेट्सनी जिंकला. हैदराबाद संघाने प्रथम फलंदाजी करीत सात बाद 130 धावा काढल्या. पंजाब कृषी विद्यापीठाच्या संघाने १५.१ षटकातच ३ बाद १३४ धावा काढत विजय जय प्राप्त केला. पंजाब विद्यापीठाच्या संघातील सिमर पंदेर यांनी ५३ तर जतिंदर यांनी ५६ धावांची खेळी केली.




## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा योगासन संघ खेलो इंडिया विद्यापीठ गेम्ससाठी पात्र वैभव श्रीरामेला वैयक्तिक गटात रौप्यपदक

कीटस विद्यापीठ, भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत दमदार कामगिरी करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या योगासन संघाने खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. तर अ. भा. आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत वैयक्तिक गटात वैभव श्रीरामेने रौप्यपदक आपल्या नावे केले असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी दिली.

काही दिवसांपूर्वी काँगुनाडू अण्णा विद्यापीठ, चेन्नई येथे झालेल्या दक्षिण- पश्चिम विभागीय स्पर्धेत विद्यापीठाच्या मुला-मुलींच्या संघाने अनुक्रमे सहावे आणि सातवे स्थान प्राप्त करीत अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले होते. आता या स्पर्धेत मुलांच्या संघाने पाचवे तर मुलींच्या संघाने आठवे स्थान प्राप्त करीत खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत धडक दिली आहे. याशिवाय वैभव श्रीरामेने पुरुषांच्या वैयक्तिक प्रकारात दुसऱ्या स्थानासह रौप्यपदक मिळविले. संघाचे प्रशिक्षक डॉ. तेजसिंह जगदाळे यांच्या मार्गदर्शनात नागपूर संघाने हे यश प्राप्त केले.

यंदा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ योगासन संघाकडून खेलो इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेत पदकांची अपेक्षा असल्याचे मत डॉ. सुर्यवंशी यांनी व्यक्त केले. दोन्ही संघाच्या या कामगिरीबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, डॉ. सोनाली शिरभाते, डॉ डी.सी वानखेडे डॉ. कुमकुम बारोकार यांनी विद्यापीठ संघाचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यापीठाच्या पुरुष संघात- वैभव श्रीरामे, प्रणय कंगाले, वंश खिंची- तिन्ही एस.बी. सिटी महाविद्यालय, हर्षल चुटे- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, ओम राखडे- धनवटे नॅशनल कॉलेज. राखीव- आकाश बुरडे, अनिकेत खारपुरीया, क्षितीज भांडवलकर- तिन्ही महाविद्यालय, काटोल, आशिष मुरकुटे- एडी कॉलेज. तर महिला संघात कल्याणी चुटे, सुहानी गिरीपुंजे- दोन्ही एसबी सिटी कॉलेज, छकुली सेलोकार- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, रचना अंबुलकर- प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालय, अलिशा गायमुखे- कमला नेहरु महाविद्यालय, श्रेया धामडे- नबीरा महाविद्यालय. राखीव- श्रावणी गोलाईत- कमला नेहरु महाविद्यालय, आदिती चौधरी- आयडीसीपी नागपूर, ऋतुजा डोंगरे- नबीरा यामिनी गवई- नागार्जूना इंस्टिट्यूट यांचा समावेश आहे.






## शादाब, आदर्श, रियाला कांस्यपदक

### पूर्व-उत्तर- पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स

भुवनेश्वर येथे सुरू असलेल्या पूर्व-उत्तर- पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुषांच्या दहा हजार मीटर शर्यतीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शादाब पठाणने कांस्यपदक तर आदर्श भुरेने शंभर मीटर धावण्यात आणि १५०० मीटर धावण्यात रिया दोहतरेने कांस्यपदक मिळवित प्रथमच विद्यापीठाच्या स्पर्धेत पदक मिळविण्याची कामगिरी केली आहे.

स्पर्धेत १० हजार मीटर धावण्यात पुरुष गटात नागपूर विद्यापीठाच्या शादाब पठाणने २९ मि. ३८.७४ अशी वेळ नोंदवित तिसऱ्या स्थानासह कांस्यपदक प्राप्त केले. प्रथम स्थान शिवाजी विद्यापीठाच्या उत्तम पाटीलने तर द्वितीय स्थान लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचा रिंकू सिंगने प्राप्त केले.

वर्धा जिल्ह्यातील सेलू येथील डॉ. आरजी भोयर कॉलेजचा विद्यार्थी असलेला आदर्श भुरेने अंतिम शर्यतीत १०.८१ सेकंद अशी वेळ देत प्रमुख स्पर्धेत प्रथमच कांस्यपदक जिंकले. प्रथम स्थान चंदीगढच्या गुरविंदर सिंगने तर द्वितीय स्थान हर्ष राउतने प्राप्त केले. आदर्श दोनशे मीटर शर्यतीत भाग घेणार असून शंभर मीटरच्या अंतिम शर्यतीपूर्वी तो ४ बाय १०० मीटर रिले शर्यतीच्या प्राथमिक फेरीत सहभागी झाला होता. यात नागपूर विद्यापीठाला चौथे स्थान मिळाले. या कामगिरीमुळे शादाब व आदर्श चेन्नई येथे चार जानेवारीपासून होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी, प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, डॉ. आदित्य सोनी आदींनी खेळाडूंचे अभिनंदन करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव तयारीचा कुलगुरूंनी घेतला आढावा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात १२ ते १६ जानेवारी दरम्यान आयोजन



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव १२ ते १६ जानेवारी २०२४ दरम्यान होणार आहे. विद्यापीठ क्रीडा संकुल परिसरात आयोजित क्रीडा महोत्सव तयारीचा माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी आढावा घेतला. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमानाखाली होणार आहे. क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रातील २२ विद्यापीठांचे सुमारे २४०० विद्यार्थी सहभागी होणार आहे. या क्रीडा स्पर्धेत ॲथलेटिक्स, बॅटमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल आदी खेळांचे मुले व मुलींच्या संघांचे सामने होणार आहे. राज्य क्रीडा महोत्सव जवळ येत असल्याने विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाकडून जोरदार तयारी सुरू आहे. स्पर्धा नियोजित असलेल्या परिसरातील विविध कामांची पाहणी कुलगुरू डॉ. चौधरी यांनी केली. स्पर्धा परिसरात नव्याने पार्किंग व्यवस्था तयार करणे. नवीन कॅफेट एरिया उभारणे. परिसराची रंगरंगोटी करणे. कायमस्वरूपी नवीन ३ प्रवेशद्वाराची निर्मिती करणे. परिसर सौंदर्यकरण त्याचप्रमाणे बास्केटबॉल कोर्टची रंगरंगोटी करणे आदी महत्त्वपूर्ण सूचना कुलगुरूंनी यावेळी संबंधित विभागाला दिल्या. मैदानी खेळ परिसरात विविध सुविधा निर्माण करीत या भागात विद्‌युत रोषणाई करण्याच्या सूचना कुलगुरूंनी दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, विद्यापीठ अभियंता श्री नितीन विश्वकार, उद्यान अधीक्षक श्री प्रवीण गोतमारे, उपअभियंता श्री महेंद्र पाटील, डॉ. आदित्य सोनी, डॉ. नितीन जांगीटवार, डॉ. मनोज आंबटकर, राजेंद्र बालपांडे यांच्यासह अन्य उपस्थित होते. स्पर्धा परिसरात सुसज्ज असा वैद्यकीय कक्ष उभारण्याबाबत कुलगुरूंनी यावेळी सूचना दिल्या.



## ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाला जेतेपद

### आंतर महाविद्यालयीन पुरुषांची हॉकी स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन हॉकी पुरुष स्पर्धेतील अंतिम सामन्यात दमदार खेळाच्या जोरावर ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने जेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी एसएफएस महाविद्यालयाला मात दिली. ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात ६-१ अशा गोलने ज्योतिबा कॉलेजने विजय मिळविला. सामन्यात सुरुवातीपासून ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे वर्चस्व दिसून आले.

विजयी संघाच्या भानू याने अवघ्या ००.४४ सेकंदाने पहिला गोल नोंदविला. त्यानंतर दुसरा गोल १५.१७ मिनिटांनी केला. त्यामुळे २-० अशी आघाडी ज्योतिबा संघाने मिळविली. यानंतर लगेच एसएफएस महविद्यालयाच्या गुलशन याने १७ मिनिटाला गोल करीत सामन्यात २-१ अशी गोलसंख्या केली. त्यानंतर एसएफएस महविद्यालयाला चांगल्या संधी भेटल्या पण त्या संधीचे गोलमध्ये रुपांतर करण्यात हा संघ अपयशी ठरला.

दुसऱ्या हाफमध्ये ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या सुमितने एकामागे एक असे दोन गोल करीत सामन्यात ४-१ आघाडी घेतली. काही वेळाने सामन्यात पुन्हा सुमितने आक्रमण करीत पेनाॅल्टी कॉर्नर मिळविला. ३२.१३ मिनिटांनी त्याला गोलमध्ये रुपांतर केले. यादरम्यान पुन्हा एकवेळा आक्रमण करीत जेसीपीईला मिळालेल्या चांगल्या संधीचे सोने केले. शेवटी भानु आणि दिपक याने प्रत्येकी एक गोलकरीत ६-१ ने ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयने एसएफएस महाविद्यालयाला नमवित स्पर्धेतील जेतेपद आपल्या नावे केले.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत राणीबाई अग्निहोत्री शारीरिक शिक्षण महाविद्यालय वर्धा यांनी बाजी मारली. अंतिम सामन्याच्या बक्षिस वितरण समारंभाकरीता प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण विभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दातारकर व डॉ. आदित्य सोनी उपस्थित होते. स्पर्धाप्रमुख डॉ. सुरेंद्र तिवारी यांनी कार्यकमाचे संचालन केले. याप्रसंगी डॉ. राजु राऊत, डॉ. मोहन कडवे, डॉ. सोनाली बांद्रे, महेश महतो, नितीन येमदे उपस्थित होते. पंचाची भुमिका इमतियाज रहिम, अभिलाश सांडे यांनी पार पाडली.



## एक शतक, १२ अर्ध शतकाने धावांचा पाऊस

### हरियाणा, जम्मूच्या खेळाडूंनी गाजविला दुसरा दिवस

### अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या यजमान पदाखाली शहरातील विविध मैदानांमध्ये सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचा दुसरा दिवस हरियाणा व जम्मूच्या खेळाडूंनी गाजविला. चौधरी चरणसिंह हरियाणा कृषी विद्यापीठाचा खेळाडू संजय गुणघास याने ५८ चेंडू मध्ये तब्बल १०६ धावा ठोकत स्पर्धेतील पहिले शतक बनवीत संघाला विजय मिळवून दिला. या सोबतच अन्य सामन्यांमध्ये एकूण १२ अर्ध शतके खेळाडूंनी केली.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठासोबत हरियाणा कृषी विद्यापीठाची लढत झाली. यामध्ये प्रथम फलंदाजी करीत हरियाणा कृषी विद्यापीठाच्या संघाने २० षटकात २ बाद २२७ धावांचा डोंगर उभा केला. यात संजय गुनघास यांनी १२ चौकार आणि २ षटकार मारत ५८ चेंडूत तब्बल १०६ धावा काढत या स्पर्धेतील पहिले शतक झळकावले. त्यांना नितम यांनी ५६ धावा तर डॉ. विजय अहलावत यांनी ४३ धावा काढत उत्तमपणे साथ देत संघाला विजय प्राप्त करून दिला. जळगाव विद्यापीठाच्या संघाने १७.५ षटकात १० बाद १०० धावा काढल्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या (ब) संघासोबत झालेल्या लढतीत जम्मू विद्यापीठाच्या संघाने निरंजन सिंह ५३ धावा व विशाल सुदन यांच्या ५१ धावांमुळे ४ बाद १९२ अशी धावसंख्या उभारली भरली. यात जम्मू विद्यापीठाच्या २ खेळाडूंनी एकाच डावात २ अर्ध शतके केली. जम्मू विद्यापीठाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११६ धावांनी पराभव केला. या सामन्यात जम्मू विद्यापीठाचे राजकुमार बक्षी यांनी ४ षटकात केवळ ११ धावा देत ५ बळी घेतले. महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतकने ७ बाद २०५ धावांचे डोंगर उभे केले. यामध्ये नरेंद्र शिलक यांनी ४३ चेंडूत ४ षटकार व १२ चौकार मारीत ८५ धावा काढल्या. २०५ धावांचा पाठलाग करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगरचा संघ १६.४ षटकात सर्वबाद ११५ एवढी धावसंख्या उभारू शकला. या संघातील अनवर खान रहमान खान यांनी ३१ चेंडूत ३ षटकार व ७ चौकार मारत अर्धशतक पूर्ण केले. रोहतक संघातील पंकज नैन व संभाजीनगर विद्यापीठाचे बलभीम मरकड यांनी प्रत्येकी ४ बळी घेतले. पंजाब विद्यापीठ पटियालाच्या संघाने ८ बाद १४२ धावा काढल्या. प्रत्युत्तर देताना डॉ. शाह जहान यांच्या ६४ धावांसह केंद्रीय विद्यापीठ हरियाणाचा संघ ९ बाद १२१ धावाच काढू शकला. या सामन्यात पटियाला संघाच्या प्रीत पाल सिंह यांनी ४ बळी घेतले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

विरुद्ध झालेल्या सामन्यात दिल्ली विद्यापीठाने ६ विकेट्सनी विजय प्राप्त केला. अमरावती विद्यापीठाच्या संघाने प्रथम फलंदाजी करीत सर्व बाद ७४ धावा काढल्या. दिल्ली विद्यापीठाच्या संघाने १० षटकातच ४ बाद ७७ धावा काढत विजय मिळविला. दिल्ली विद्यापीठाचे मयंक यांनी ४ बळी टिपले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ (अ) संघाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघाला ७० धावांनी पराजित केले. नागपूर विद्यापीठ संघाने प्रथम फलंदाजी करीत निलेश रोटके यांच्या ३४ चेंडूत ३ षटकार व ५ चौकार मदतीने काढलेल्या ६० धावासह एकूण ५ बाद २०० धावा केल्या. सोलापूर संघ १३० धावांवरच गारद झाला. जामिया मिलिया इस्लामिया संघाने ९ गडी राखत नांदेड विद्यापीठाचा पराभव केला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सर्व बाद १०० धावा काढल्या. जामिया मिलिया विद्यापीठाने केवळ ७.४ षटकातच वाहिद यांनी ६ षटकार व ५ चौकार मारत २७ चेंडूत ६९ धावा काढत संघाला विजय मिळवून दिला. लुवास हिसार संघाने ९ गडी राखत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचा पराभव केला. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाने अभिजीत कोठावले यांनी काढलेल्या ४३ धावांच्या मदतीने एकूण ९ बाद ११३ धावा केल्या. हिसार संघाने करीत डॉ. गौरव चारया यांनी काढलेल्या ५५ धावांच्या मदतीने ११ व्या षटकातच ९ गडी राखत विजय मिळविला. माफसू नागपूर सोबत झालेला सामना हिमाचल प्रदेश विद्यापीठाने ६ गडी राखत जिंकला. मापसूने प्रथम फलंदाजी करीत ९ बाद १२० धावा काढल्या. या धावांचा पाठलाग करताना हिमाचल प्रदेश विद्यापीठाने १३.५ षटकातच ४ बाद १२१ धावा काढत विजय प्राप्त केला. ललित यांनी ४० चेंडू ५४ धावा काढल्या. परभणी विद्यापीठाने मुंबई विद्यापीठाला १० धावांनी पराजित केले. परभणी संघाने प्रथम फलंदाजी करीत ४ बाद १६१ धावा काढल्या. मुंबई संघाला ६ बाद १५१ धावा काढत पराभव स्वीकारावा लागला. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक विद्यापीठाचा पंजाब कृषी विद्यापीठ लुधियानाने ९ गडी राखत पराभव केला. रामटेक विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करीत ९ बाद ९९ धावसंख्या उभारली. लुधियाना संघाने बाराव्या षटकात ९ गडी राखत विजय प्राप्त केला. पंजाब विद्यापीठ चंदीगड ने ७८ धावांनी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिकचा पराभव केला. पंजाब विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करीत राहुल पथानिया यांनी ३८ चेंडूत काढलेल्या ६० धावांच्या सहाय्याने ७ बाद १७९ धावा काढल्या. महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाचा संघ १०१ धावा काढत सर्व बाद झाला. पंजाब विद्यापीठाचे विजयकुमार डोंगरा यांनी ३ बळी घेतले. डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संघाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक संघाचा ११ धावांनी पराभव केला. अकोला संघाने ८ बाद १४४ धावसंख्या उभारली तर नाशिक संघाला ४ बाद १३३ धावा काढता आल्या. नाशिक विद्यापीठाचे अभिषेक देशमुख यांनी ४ बळी टिपले.






## भरडधान्य औषधी गुणयुक्त पौष्टिक आहार - डॉ. शरद निंबाळकर
### पदव्युत्तर गृह विज्ञान विभागात भरडधान्य पाककृती प्रदर्शनी

भरडधान्य हे औषधी गुणयुक्त पौष्टिक आहार असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले. आंतरराष्ट्रीय पौष्टिक भरडधान्य वर्षाच्या निमित्ताने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृह विज्ञान विभागात भरडधान्य पाककृती प्रदर्शनी शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आली. तत्पूर्वी तज्ञ म्हणून डॉ. निंबाळकर मार्गदर्शन करीत होते.

गृहशास्त्र विज्ञान विभागाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर, यूजीसी-एचआरडीसी सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ. रेखा शर्मा, गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ. कल्पना जाधव, सहसंयोजक डॉ. प्राजक्ता नांदे यांची उपस्थिती होती. यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक भरडधान्य म्हणून साजरे केले जात आहे. पौष्टिक भरडधान्याचे आहारमधील महत्व व फायदे या बाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून पदव्युत्तर गृह विज्ञान विभागाने भरडधान्यांपासून निर्मित विविध खाद्यपदार्थांची प्रदर्शनी आयोजित केली आहे. यावेळी पुढे बोलताना माजी कुलगुरू डॉ. निंबाळकर यांनी या भरडधान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात न्यूट्रिशन्स, फायबर, कॅल्शियम, प्रोटीन्स, मिनरल्स असल्याचे सांगत हे सर्व गुणधर्म आजार नाहीसे करणारे असल्याचे सांगितले. बाजरी, नाचणी, ज्वारी, भगर, राजगिरा, कोदो, कुटकी या मधील औषधी गुणधर्मांची माहिती त्यांनी भाषणामध्ये दिली. राजगिऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर फायटोस्टेरास्टॉल्स असतात. फायटोस्टेरॉल्स हे एक प्रकारे जनरल मेडिसिन असून त्यामध्ये कॅन्सर प्रतिबंधक तत्व असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी यूजीसी-एचआरडीसी सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ. रेखा शर्मा यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे भरडधान्याबाबत विस्तृत माहिती दिली. अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी सामान्य व्यक्ती भरडधान्यापासून दूर जात असल्याचे सांगितले. सर्व सामान्य व्यक्तींपर्यंत भरडधान्याचे महत्त्व पटवून देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उद्योगाच्या मागणीप्रमाणे भरडधान्याच्या वस्तू विकसित करीत त्याबाबत पेटंट घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख डॉ. कल्पना जाधव यांनी केले. संचालन डॉ. शुभदा जांभुळकर यांनी केले तर आभार डॉ. प्राजक्ता नांदे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विभागातील विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

TheHitavada
Nagpur City Line | 2023-12-01 | Page- 1
ehitavada.com

# President In city TODAY

## Governor Ramesh Bais, Chief Minister Eknath Shinde also arriving today

■ Staff Reporter

PRESIDENT of India Droupadi Murmu is visiting Nagpur on Friday December 1, 2023. She will stay for two days in city. On Friday she will inaugurate Platinum Jubilee function at Government Medical College and Hospital (Medical) at 4 pm. On Saturday, December 2, the President will deliver address at 111th convocation of Rashtrasant Tukadoji Maharaj University at 10 am.

On Friday, the President will arrive at Nagpur's Dr Babasaheb Ambedkar International Airport from Pune at 12.10 pm by a special Indian Air Force aircraft. At 3.10 pm, the President will visit Jagannath temple, at Rameshwari road and participate in darshan and aarti. The President will be present as the chief guest at the inauguration

(Contd on page 2)

Powered by iDocuments

TheHitavada
Nagpur City Line | 2023-12-01 | Page- 2
ehitavada.com

2

# President In city TODAY

(Contd from page 1

of the Platinum Jubilee program organized in the premises at 4 pm. After this program, she will proceed for Raj Bhavan and stay there.

On Saturday December 2, the President will reach Kavivarya Suresh Bhat Auditorium from Raj Bhavan at 10.30 am where she will deliver convocation address. The President will leave for Delhi at 11.45 am on a special flight of Indian Air Force from Nagpur.

Governor Ramesh Bais will be attending both functions where the President is chief [...] function of GMCH and the 111th convocation of RTMNU in the presence of the President of India.

Governor will arrive at Nagpur from Pune at 12.10 pm. After attending both functions, Governor will leave for Mumbai from Nagpur airport on Saturday December 2, 2023 at 5 pm. Chief Minister Eknath Shinde too will reach Nagpur on Friday. He will remain present at airport to welcome President Droupadi Murmu at 12.10 pm. The Chief Minister will grace platinum jubilee function on Friday at 4 pm at GMCH and convocation of RTMNU on Saturday [...] President of India.

Shinde will lay the foundation stone of Gangadharrao Fadnavis Memorial Diagnostic Center at Pawanbhumi Playground on Wardha Road on Friday at 5.30 pm. Nitin Gadkari, Union Road Transport and Highways Minister; Devendra Fadnavis, Deputy Chief Minister and Guardian Minister of Nagpur; Ajit Pawar, Deputy Chief Minister; Hasan Mushrif, Medical Education Minister; will attend the event. The Chief Minister will also participate in Khasdar Sanskrutik Mahotsav at 6.45 pm on Friday. Chief Minister will leave for Mumbai on [...]

पुण्यनगरी

# नागपूर विद्यापीठाचे योगासन संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र



नागपूर : चेन्नई येथील अण्णा विद्यापीठाच्या यजमानपदाखाली झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने उत्कृष्ट कामगिरी केली. या कामगिरीच्या बळावर दोन्ही संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत नागपूर विद्यापीठाच्या पुरुष संघाने सहावे तर महिला संघाने सातवे स्थान प्राप्त केले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पात्र नागपूर विद्यापीठ पुरुष संघात वैभव श्रीरामे, प्रणय कंगाले, वंश खिंवी, हर्षल चुटे, ओम राखडे आणि महिला संघात कल्याणी चुटे, सुहानी गिरीपुंजे, छकुली सेलोकार, रचना अंबुलकर, अलिशा गायमुखे, श्रेया घामडे यांचा समावेश आहे. प्रशिक्षक म्हणून डॉ. तेजसिंह जगदाळे यांनी जबाबदारी सांभाळली. विशेष म्हणजे गतवर्षी नागपूर विद्यापीठाने जैन विद्यापीठ बंगळुरु येथे झालेल्या दुसऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ गेम्समध्ये विद्यापीठाच्या योगा संघाने पुरुष गटात सुवर्णपदक आणि महिला संघाने रौप्यपदक प्राप्त केले होते. अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र संघाचे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे आणि शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी अभिनंदन करीत स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

Smart Nagpur Edition
Dec 5, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

नागपुर भास्कर

# डिग्री शिक्षा का अंत नहीं, आजीवन जिज्ञासु बने रहें



60 से अधिक रिसर्च पत्रों के विषय सदस्यों के साथ ये पोर्टफोलियो

129 पीएचडी पारखी में 57 लड़कियों का होना

# डीपफेक तकनीक समाज के लिए बड़ा खतरा : राष्ट्रपति

■ नागपुर विद्यापीठ का 111वां दीक्षांत समारोह





छात्रों का भावनात्मक लगाव

# ‘डीपफेक’ समाजासाठी चिंतेचा विषय

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू : डॉ. रामचंद्र तुपकरी डी.एससी.ने सन्मानित

▸सकाळ वृत्तसेवा



ग्रामगीतेचा उल्लेख

# जीएच रायसोनी, सेंट विंसेंट पलोटी महा. अगले दौर में



■ अंतर कॉलेजिएट महिला हैंडबॉल टूर्नामेंट

नवभारत





# रिया, शादाब को गोल्ड मेडल

## इंटर कॉलेजिएट क्रॉस कंट्री

■ नागपुर, खेल प्रतिनिधि. नागपुर विश्वविद्यालय के क्रीड़ा विभाग की ओर से आयोजित इंटर कॉलेजिएट क्रॉस कंट्री में परुष वर्ग में शादाब पठान और महिला वर्ग [...]

### खिलाड़ियों के लिए सुविधाएं तैयार कर रहा

नवभारत

# विवि की टीमें नेशनल के लिए क्वालीफाई

## वेस्ट जोन इंटर-यूनिवर्सिटी योगा टूर्नामेंट

